# विदर्भ प्रजासत्ताक

RNI No. - MAHMAR 2023/84526

https://epaper.vidarbhaprajasattak.com E-Mail : prajasattaknews24@gmail.com Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

❑ वर्ष - २ रे ❑ अंक -१७६ वा ❑ अमरावती (महाराष्ट्र) ❑ गुरुवार दि.८ ऑगस्ट २०२४ ❑ संपादक - शुभांगी जोशी ❑ मुल्य - १ रु. ❑ पृष्ठ -६





## बांग्लादेशातील व्हिसा केंद्र अनिश्चित काळासाठी बंद; भारताचा मोठा निर्णय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ढाका**

सरकारी नोकऱ्यांमधील आरक्षण व्यवस्थेच्या विरोधात बांगलादेशात गेल्या अनेक दिवसांपासून सुरु असणाऱ्या आंदोलनात आतापर्यंत ४०० पेक्षा जास्त लोकांचा मृत्यू झाला आहे तर अनेक जण जखमी झाले आहे. देशात सत्तापलट झाल्यानंतर अल्पसंख्यक हिंदू समाजाला टार्गेट केले जात आहे. या घटनांवर जगभरातून चिंता व्यक्त केली जात आहे. या घडामोडीवर भारत सरकारची बारकाईने नजर आहे. यातच आता भारताने मोठा निर्णय घेतला आहे. भारताने बांग्लादेशात दूतावासाचे व्हिसा




केंद्र अनिश्चित काळासाठी बंद केले आहे.

भारतासाठी आता कठीण काळ सुरू झाला आहे. शेख हसीना यांनी सत्ता सोडल्याने आता बांग्लादेशात त्या सर्व गोष्टी होतील ज्या चीन आणि पाकिस्तानसाठी फायदेशीर ठरतील. देशातील कोणत्याही प्रकल्पात भारताचा प्रभाव राहणार नाही. त्यामुळे आगामी काळात व्यापारी, राजकीय आणि सामरिक या सगळ्या आघाड्यांवर भारताला अधिक सावध राहावे लागणार आहे. शेख हसीना यांच्या कार्यकाळात सन २००९ पासून दोन्ही देशांत ज्या सकारात्मक गोष्टी घडल्या आहेत त्या सगळ्या थांबतील.

याची प्रचिती येण्यास सुरुवात झाली आहे. बांग्लादेशातील सध्याची परिस्थिती पाहता येथील व्हिसा केंद्र बंद करण्याचा निर्णय घेतला आहे. तसेच येथील दूतावासांच्या सुरक्षेत वाढ करण्यात आली आहे. भारतीय व्हिसा अर्ज केंद्राने (आयव्हीएसी) घोषणा केली आहे की बांग्लादेशातील अस्थिर स्थिती लक्षात घेता सर्व व्हिसा केंद्र अनिश्चित काळासाठी बंद राहतील. व्हिसासाठी अर्ज कधी करावा याची माहिती एसएमएसच्या माध्यमातून देण्यात येईल. बांग्लादेशातील भारतीय उच्चायोग आणि चितगाव, राजशाही, खुलना, सिलहट येथील वाणिज्य दुतावासांतील राजकीय उपस्थिती कमी करण्यात आली आहे. आवश्यक नसणारे कर्मचारी आणि त्यांच्या कुटुंबियांना माघारी बोलावण्यात आले आहे.अशा परिस्थितीतही भारतीय उच्चायोग अजूनही कार्यरत आहे आणि आवश्यक तितके कर्मचारी, वरिष्ठ राजनयिक येथे आहेत. कोणत्याही देशाबरोबर राजनयिक संबंध प्रस्थापित करण्यात दूतावासाची भूमिका महत्वाची असते. मिळालेल्या माहितीनुसार दूतावास दुसऱ्या देशांत राहणाऱ्या नागरिकांना मदत करतो. जगातील जवळपास १२१ देशांत भारतीय दूतावास आहेत. या व्यतिरिक्त अनेक देशात वाणिज्य दूतावासही सुरू करण्यात आले आहेत. याच दूतावासांच्या माध्यमातून भारत यात्रा करण्यास इच्छुक असणाऱ्या विदेशी नागरिकांना व्हिसा दिला जातो.

## दररोज अपमान होतोय! संतापाच्या भरात सभापती निघून गेले; 'विनेश'वरून राज्यसभेत गदारोळ

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ नवी दिल्ली**

संसदेत आज अनेक महत्वाची विधेयके सादर होणारआहेत. ज्यामध्ये वक्फ ॲक्टमध्ये संशोधन विधेयकाची सर्वाधिक चर्चा आहे. याच दरम्यान कुस्तीपटू विनेश फोगाटचा मुद्दाही चांगलाच चर्चेत आहे. या प्रकरणाचे पडसाद कालपासून देशभरात उमटत आहेत. संसदही यालाअपवाद नाही. काल याच मुद्द्यावर लोकसभेत गदारोळ झाला होता. आजही राज्यसभेत हा मुद्दा उपस्थित होताच गोंधळाला सुरुवात झाली. विरोधकांनी आरोपांचा धडाकाच सुरू केला. यामुळे राज्यसभेचे सभापती जगदीप धनखड कमालीचे नाराज झाले. विरोधी पक्षाच्या नेत्यांच्या वर्तणुकीवर संताप व्यक्त करत त्यांनी काही काळासाठी सभागृह सोडलं.

संसदेत आज विरोधकांनी पुन्हा



विनेश फोगाटचा मुद्दा उपस्थित केला. गोंधळ घालण्यास सुरुवात केली. मल्लिकार्जुन खरगे म्हणाले एकदम असं काय झालं की विनेशला थेट अपात्र घोषित करण्यात आलं पण सरकारनं काहीच केलं नाही याचं कारण आम्हाला समजलंच पाहिजे. खर्गे यांच्या या वक्तव्यानंतर टीएमसीचे खासदार डेरेक ओब्रायन यांनी आरडाओरडा करत विरोध केला. यावर धनखड मात्र चांगलेच नाराज झाले.

धनखड म्हणाले सभागृहात सभापतींनाच आव्हान देण्यात आलं. माझ्याबरोबर योग्य व्यवहार झाला नाही. त्यामुळे काही काळासाठी मी येथे बसण्यास स्वतः ला सक्षम समजत नाही. विनेशच्या बाबतीत जे काही घडलं त्यामुळे सगळा देशच दुःखी आहे. आता यावर राजकारण तरी करू नका. विनेशला ते सगळं काही मिळेल जे एखाद्या पदकविजेत्या खेळाडूला मिळतं. पण माझी तुम्हा सगळ्यांना विनंती आहे की आता तरी या मुद्द्यावर राजकारण करू नका असे धनखड म्हणताच टीएमसी आणि काँग्रेसच्या सदस्यांनी सभागृहातून वॉक आऊट केले.सभागृहाची मान कमी करू नका. बेलगाम वर्तणूक करू नका. काही खासदार चुकीची वक्तव्ये करत आहेत. मला या सभागृहाचं जितकं समर्थन पाहिजे होतं तितकं मिळालं नाही. मी प्रयत्न भरपूर केले. मी आज जे पाहिलं. खासदारांनी ज्या पद्धतीने वर्तणूक केली. त्यामुळे या ठिकाणी बसणं निदान काही काळासाठी तरी मला शक्य नाही असे म्हणत सभापती जगदीप धनखड यांनी सभागृह सोडलं.

## शरद पवार अन् अजितदादांचा धडाकेबाज कार्यक्रम

### राज्याच्या जिल्ह्यांमधून फिरणार राष्ट्रवादीच्या दोन यात्रा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८पुणे**

राज्यातील दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेस विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर राज्यातून मतदारसंवाद यात्रा काढणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून 'शिवस्वराज' तर राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाकडून 'जनसन्मान' यात्रा निघणार आहे. राज्याच्या सर्व जिल्ह्यांमध्ये व प्रमुख शहरांमध्ये यात्रा फिरणार असून सभा, प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते यांच्या बैठका असा धडाकेबाज कार्यक्रम आखण्यात आला आहे.

शिवस्वराज यात्रेचे नेतृत्व प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील व खासदार डॉ. अमोल कोल्हे करणार आहेत. जुन्नरमधून ९ ऑगस्टला यात्रेच्या पहिल्या टप्प्याची सुरुवात होईल. त्यानंतर १७ ऑगस्ट व पुढे याच पद्धतीने ऑगस्टअखेरपर्यंत यात्रा जारी राहील. सातारा येथे यात्रेचा समारोप करण्याचे प्रस्तावित असून तिथे ज्येष्ठ नेते शरद पवार उपस्थित राहणार आहेत. खासदार सुप्रिया सुळेही यात्रेत सहभागी होणार आहेत. प्रत्येक मोठ्या शहरांमध्ये यात्रेदरम्यान जाहीर सभेचेही आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती राष्ट्रवादी काँग्रेसच्या (शरद पवार) गटाच्या प्रदेश कार्यालयाकडून देण्यात आली.



उपमुख्यमंत्री अजित पवार त्यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसच्या यात्रेचे स्वत: नेतृत्व करणार आहेत. त्याशिवाय प्रदेशाध्यक्ष खासदार सुनील तटकरे खासदार प्रफुल्ल पटेल, सुनेत्रा पवार व पक्षाचे अन्य ज्येष्ठ तसेच युवा पदाधिकारी यात्रेत असतील. जनसन्मान असे या यात्रेचे नामकरण करण्यात आले आहे. या यात्रेतही मोठ्या शहरांमध्ये, जिल्ह्यातील प्रमुख ठिकाणी जाहीर सभांचे आयोजन करण्यात आले आहे. राज्य व केंद्र सरकारच्या माध्यमातून अजित पवार यांनी राज्यात सुरू केलेल्या महिला सबलीकरण वगैरे योजनांची माहिती यात्रेच्या माध्यमातून जनसामान्यांपर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न यात्रेतून करण्यात येणार आहे. नाशिकमधील दिंडोरी येथून ८ ऑगस्टला ( गुरुवार) यात्रेची सुरुवात होत आहे. ही यात्राही वेगवेगळ्या टप्प्यात मार्गक्रमण करणार आहे. त्याचे वेळापत्रक तयार होत आहे, असे प्रदेश शाखेकडून सांगण्यात आले.

## उद्धव ठाकरे यांची दिल्ली वारी यशस्वी, विधानसभेचे सूत्रही ठरले

### महाविकास आघाडीतील तीनही पक्ष एकत्र लढण्यावर सहमत

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ नवी दिल्ली**

शिवसेना उबाठा नेते उद्धव ठाकरे तीन दिवसांच्या दिल्ली दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यात बुधवारी त्यांना मोठे यश मिळाले. काँग्रेसच्या वरिष्ठ नेत्यांच्या भेटीगाठी त्यांनी घेतल्या. काँग्रेस सोबत झालेल्या बैठकीत येत्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्रीपदाचा चेहरा जाहीर करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. त्या मागणीला यश आल्याचे वृत्त आहे. महाविकास आघाडी विधानसभा निवडणुकीपूर्वी आपला मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करणार आहे.



महाविकास आघाडीचा मुख्यमंत्रिपदाचा चेहर उद्धव ठाकरे असणार आहे, असा निर्णय झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांच्या निवासस्थानी महाविकास आघाडीच्या नेत्यांची बुधवारी बैठक झाली. या बैठकीत महाविकास आघाडीतील तीनही पक्ष एकत्र लढण्यावर सहमत झाले. त्यानुसार काँग्रेस पक्षाला सर्वाधिक जागा मिळणार आहे. तसेच दुसऱ्या क्रमांकाच्या जागा शिवसेनेला मिळणार आहे. तीन नंबरवर शरद पवार यांचा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष असणार आहे. बुधवारी दिल्लीत झालेल्या बैठकीत असा निर्णय झाल्याची माहिती सूत्रांनी दिली.

विधानसभा निवडणुकीसाठी घटक पक्षांच्या विजयी असलेल्या जागा सोडून इतर जागांवर चर्चा होणार आहे. शिवसेना उबाठा, शरद पवार यांची राष्ट्रवादी आणि काँग्रेस हे तीन पक्ष १५५ जागा सोडून इतर जागांवर चर्चा करतील. जागा कोणाकडे असली तरी उमेदवार देताना जिंकण्याची क्षमता लक्षात घेऊनच उमेदवारी दिली जाणार आहे. मुख्यमंत्रीपदाबाबत बुधवारी सकाळी उद्धव ठाकरे यांना माध्यमांनी विचारले होते. मुख्यमंत्री म्हणून तुम्ही चांगले काम केले आहे. यामुळे तुम्हीच येत्या विधानसभा निवडणुकीत मुख्यमंत्रिपदाचा चेहरा असणार का? असे विचारले होते. त्यावेळी त्यांनी हा प्रश्न इतर पक्षांना (काँग्रेस, शरद पवारांची राष्ट्रवादी) विचारा, असे उत्तर उद्धव ठाकरे यांनी दिले होते. परंतु आता तेच मुख्यमंत्रीपदाचे उमेदवार असणार आहे, हे जवळपास निश्चित झाले आहेत.

**तीन पक्षांचा वॉररुम एकच**

विधानसभा निवडणुकीसाठी तीन पक्षाचा वॉररुम एकच असणार आहे. तसेच एकच अजेंडा घेऊन महाविकास आघाडी जनतेसमोर जाणार आहे. जनतेमध्ये तीन पक्षांत उत्तम एकजूट असल्याचे दाखवण्याचा प्रयत्न होणार आहे. प्रचारात महाविकास आघाडीतील नेते महत्वाच्या सभांमध्ये एकत्र असणार आहे.

## परिस्थितीनुसार भूमिका बदलता का? कोर्टानं फटकारल्यावर चित्रा वाघ म्हणाल्या, मी हे प्रकरण...

**विदर्भ प्रजासत्ताक दि.८मुंबई**

मंत्री संजय राठोड प्रकरणात मुंबई हायकोर्टाने भाजपच्या महिला प्रदेशाध्यक्ष असलेल्या चित्रा वाघ यांना खडेबोल सुनावले आहेत. राज्यात महाविकास आघाडीचे सरकार असताना तत्कालीन मंत्री संजय राठोड यांच्यावर एका तरुणीच्या आत्महत्येप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात यावा अशी मागणी करत भाजप नेत्या चित्रा वाघ यांनी मुंबई हायकोर्टात जनहित याचिका दाखल केली होती. मात्र आता चित्रा वाघ यांच्या वकिलाने ही याचिका मागे घेण्याची परवानगी मागितली. यावरुन हायकोर्टानं वाघ यांना परिस्थितीनुसार भूमिका बदलता का असं म्हणत फटकारलं. त्यानंतर चित्रा वाघ यांनी याबाबत स्पष्टीकरण दिलं आहे.

चित्रा वाघ यांचे वकील परांजपे यांनी ही याचिका निकाली काढण्याची वा मागे घेण्याची कोर्टाकडे परवानगी मागितली. मात्र, याचिका मागे घेतली तरी नंतर न्यायालयात दाद मागण्याची मुभा द्यावी, अशीही विनंती वाघ यांच्या वकिलाने केली होती.

या प्रकरणाच्या सुनावणीदरम्यान, कोर्टाने चित्रा वाघ यांना फटकारलं आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार



उपाध्याय यांच्या समोर या प्रकरणाची सुनावणी झाली. 'आम्ही याचिका निकाली का काढावी? वाघ यांनी त्यांची मागणी काय आहे हे आधी स्पष्ट करावे. परिस्थिती बदलली की, तुमची भूमिका बदलते. जनहित याचिकांद्वारे खेळ खेळला जात आहे. वाघ यांच्यासारख्या राजकीय नेत्या न्यायालयालाही त्यात गुंतवतात. पण, आम्ही त्याला प्रोत्साहन देणार नाही, असे कोर्टानं म्हटलं. न्यायमूर्तींनी फटकाऱ्यानंतर चित्रा वाघ यांचे वकील परांजपे यांनी आपल्याकडे याचिका मागे घेण्यासंबंधी सूचना नाहीत, त्यामुळे यावर युक्तिवाद करू, असे कोर्टाला सांगितले.

दुसरीकडे या प्रकरणाची चर्चा होऊ लागल्यानंतर चित्रा वाघ यांनी स्पष्टीकरण दिलं आहे. मंत्री संजय राठोड प्रकरणी माध्यमांमध्ये विविध बातम्या येत आहेत.सद्या हे प्रकरण न्यायप्रविष्ठ आहे त्यामुळे त्यावर बाहेर टिप्पणी करणे योग्य ठरणार नाही. मनासारखा निकाल आला की लोकशाही जिंकली आणि निकाल विपरीत गेला की न्यायालयावर दोषारोप करणाऱ्यांना न्यायालयीन प्रक्रिया समजावून सांगणे तसेही कठीण आहे. पण एक बाब याठिकाणी स्पष्ट करू इच्छिते की, मी हे प्रकरण मागे घेण्याच्या कुठल्याही सूचना माझ्या वकिलांना दिलेल्या नाहीत. न्यायालयाने एखादी मौखिक टिप्पणी केली याचा अर्थ तो त्या प्रकरणाचा अंतिम निकाल नाही.

## जिल्हाधिकारी कार्यालयावर शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी काँग्रेसचा मोर्चा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाच्या वतीने आज अमरावती जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चा काढण्यात आला. अमरावतीच्या इर्विन चौकातील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करून या मोर्चाला सुरुवात झाली. माजी मंत्री व काँग्रेस नेत्या यशोमती ठाकूर, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष बबलू देशमुख,माजी आमदार विरेंद्र जगताप यांच्यासह काँग्रेसच्या हजारो पदाधिकारी,कार्यकर्ते मोर्चात सहभागी झाले होते.

काँग्रेस पदाधिकाऱ्यांकडून सरकारच्या विरोधात जोरदार घोषणाबाजी करण्यात आली. शेतकर्यांची संपूर्ण कर्जमाफी करण्याच्या घोषणा देण्यात आल्या.पंतप्रधान घरकुल आवास योजनाचे हफ्ते मिळाले पाहिजे,शेतकरी, शेतमजूरांना न्याय देण्याची मागणी करण्यात आली.यावेळी काँग्रेसचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठय़ा संख्येने सहभागी झाले होते.देशात कोणीही उपाशी पोटी झोपू नये, प्रत्येकाला अन्न मिळावे यासाठी उन, पाऊस, थंडी, वादळीवारा यांचा विचार न करता, न थकता

### अमरावतीत शेतकऱ्यांच्या समर्थनार्थ काँग्रेस रस्त्यावर

शेतकरी रात्रंदिवस शेतात काबाडकष्ट करून अन्नधान्य पिकवतो. भारतीय समाज व्यवस्थेतील शेतकरी हा अत्यंत महत्त्वाचा घटक आहे. आपल्या देशातील बहुतांश उद्योगधंदे, पशुधन आणि मानवी जीवन हे शेतीवर अवलंबून आहे. शेतकऱ्यांनी शेती करणे थांबवील्यास सर्व जनजीवन उध्वस्त होईल. शेतकरी जगेल तरच जग जगेल.

परंतू केंद्र व राज्य सरकारच्या नियतीत खोट असल्याने शासन




स्तरावरून शेतकऱ्यांसाठी कोणतीही आर्थिक मदत दिलेली नाही, तर शेतकऱ्यांची कर्जमाफी सुध्दा केलेली नाही. जिल्हा तर मोठ्या प्रमाणात अवकाळी व अतिवृष्टीमुळे पिकाचे नुकसान झाले ,परंतु याची मदत देखील अद्याप शेतकऱ्यांना पोहोचली नाही, मागील वर्षी शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणात पीक विमा काढला परंतु यातील ५०% शेतकऱ्यांना पिक विम्याची रक्कमच मिळाली नाही ,अलीकडे मोठ्या आर्थिक लाभाच्या योजना शासन जाहीर करीत आहे परंतु जुन्या योजनांचे पैसे मात्र रोखून ठेवलेले आहे ,आजही निराधार योजना असो की आवास योजना असो याचा निधी शासन स्तरावर रखडलेला आहे, त्यामुळे कित्येकांची घरकुल अर्धवट आहेत कित्येक लाभार्थी निधी अभावी घराचे बांधकाम सुरू केल्याने रस्त्यावर आलेले आहेत, चांदूरबाजार तालुक्यात मोठ्या प्रमाणात पावसामुळे नुकसान शेतीचे नुकसान झाले परंतु याचेही मदत शेतकऱ्यांना मिळाली नाही ,यावरून हे केंद्र व राज्य सरकार शेतकरी विरोधी असल्याचे दिसून येत आहे, या सरकारच्या विरोधात आवाज उठविण्यासाठी रमेश चेन्निथलाजी प्रभारी महाराष्ट्र यांच्या आदेशावरून प्रांताध्यक्ष नानाभाऊ पटोले यांच्या निर्देशावरून जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयावर मोर्चाचे आयोजन करण्यात आले होते.या मोर्च्या मध्ये सुधाकर भारसाकळे, हरिभाऊ मोहोड,बाळासाहेब हिंगणीकर, संजय मार्डीकर,प्रकाश काळबांडे, रामेश्वर अभ्यंकर, सतीशराव हाडोळे, श्रीकांत गावंडे,गिरीशराव कराळे,राम चव्हाण,दिलीप काळबांडे,दयाराम काळे,प्रदीप देशमुख,अरुण वानखडे, प्रवीण मनोहर,रवी पटेल,मुक्कदर खाँ पठाण,समाधान दहातोंडे,प्रकाश चव्हाण,गुणवंत देवपरे,अमोल होले,निशिकांत जाधव,नामदेव तनपुरे,किशोर देशमुख,सहदेव बेलकर, सुधाकर तलवारे, सतीश पारधी,मनोज गेडाम, अमित गावंडे,अभय देशमुख, महेंद्रसिंह गैलवार, श्रीकांत झोडपे,प्रदीप देशमुख, जहीर शेख,सागर कलाने,मुख्तार भाई, मन्ना दारसिंबे,विनोद पवार,आतिश शिरभाते, श्रीनिवास सूर्यवंशी यांची उपस्थिती होती.

## संपादकीय ......

# मीमांसा बांगला देशातील अराजकाची

दक्षिण आशियातील भारताच्या शेजारी देशांमध्ये सध्या अस्थिरता, असंतोष आणि हिंसाचाराच्या घटना वाढताना दिसत आहेत. मध्यंतरी श्रीलंकेमध्ये उद्भवलेले अराजक जगाने पाहिले. म्यानमारमध्ये लष्करशाहीचा रक्तपात सुरू आहे. नेपाळमध्ये राजकीय अस्थिरता कायम आहे. पाकिस्तान अंतर्गत प्रश्नांनी धुमसत आहे. अशा स्थितीत बांगला देशसारखा छोटा देश शेख हसीना यांच्या नेतृत्वाखाली विकासाच्या पायर्या चढत होता; परंतु पाकिस्तान, चीन आणि पश्चिमी शक्तीमुळे बांगला देशच्या अशांततेचे ग्रहण लागले आहे.

बांगला देशात काहीतरी धुसफुसत आहे आणि सरकार उलथवण्यासाठीचे, हिंसाचाराचे षड्यंत्र आखले जात आहे, याबाबतचे संकेत गेल्या काही महिन्यांपासून मिळत होते. अखेरीस ही भीती खरी ठरली आहे. अलीकडच्या काही दिवसांत मोठ्या प्रमाणात झालेल्या हिंसक निदर्शनांमुळे शेख हसीना यांना पंतप्रधानपदाचा राजीनामा देऊन देश सोडावा लागला. गेल्या तीन आठवड्यांपासून सुरू असलेल्या आरक्षणविरोधी हिंसाचारात ३०० हून अधिक लोकांचा मृत्यू झाला असून, एक हजारहून अधिक लोक जखमी झाले आहेत. खरे तर अवघ्या ७ महिन्यांपूर्वी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकांनंतर देशातील जनक्षोभ हळूहळू वाढू लागला होता. उजव्या विचारसरणीच्या बांगला देश नॅशनलिस्ट पार्टी (बीएनपी) आणि इतर राजकीय पक्षांनी सार्वत्रिक निवडणुकांवर बहिष्कार टाकला होता. हसीना सलग चौथ्यांदा सत्तेवर आल्या असल्या तरी निवडणुकीत गडबड झाल्याचा संदेश जनतेमध्ये पोहोचवण्यात विरोधी पक्षांना यश आले. इतकेच नव्हे, तर यामुळे आंतरराष्ट्रीय जगातही नकारात्मक संदेश गेला म्हणूनच या निवडणुकांचे निकाल जाहीर होऊन सत्ता स्थापन केल्यानंतर, गेल्या काही महिन्यांत हसीना यांनी सरकारला आंतरराष्ट्रीय पाठिंबा मिळवण्यासाठी भारत आणि चीनचा दौरा केला होता; पण यादरम्यान बांगला देशात त्यांच्याविरोधातील असंतोष आणखी वाढत गेला.

१९७१ मध्ये बांगला देशला पाकिस्तानच्या जुलमी राजवटीतून मुक्त करणार्या स्वातंत्र्यसैनिकांच्या तिसर्या पिढीच्या नातेवाइकांना उच्च सरकारी पदांमधील नोकर्यांमध्ये ३० टक्के आरक्षण देण्याच्या विरोधात विद्यार्थ्यांनी आंदोलन केले. त्यांच्या अनेक पिढ्यांनी आरक्षणाचा फायदा घेतला. परिणामी, बेरोजगारांना नोकर्या मिळत नसल्याचा त्यांचा युक्तिवाद होता; मात्र हसीना सरकार हे आंदोलन नीट हाताळू शकले नाही, असे दिसते. आंदोलकांना सामोरे जाण्यासाठी घेतलेल्या कठोर धोरणामुळे आंदोलन अधिकच हिंसक बनले. याचा पुरेपूर फायदा विरोधी राजकीय पक्षांनी घेतला. तेथील सर्वोच्च न्यायालयाने आरक्षण ५ टक्क्यांवर आणले असले तरी सरकारला हा संदेश जनतेपर्यंत नीट पोहोचवता आला नाही. त्यानंतर विद्यार्थी नेत्यांच्या अटकेने हे आंदोलन अधिक चिघळले. मोठ्या संख्येने आंदोलक रस्त्यावर उतरले.

हसीना यांनी आपण या आरक्षणासंदर्भात तोडगा काढू, असे म्हटले होते; पण विद्यार्थी संघटना त्यांचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हत्या. हसीना सरकार विरोधात त्यांनी जोरदार आघाडी उघडली. आक्रमक जमावाने मुक्ती चळवळीचे नेतृत्व करणारे वंगबंधू शेख मुजीबुर रहमान यांचा पुतळाही फोडला, यावरून जनक्षोभाची त्रिवता किती आहे, याचा अंदाज लावता येतो. बांगला देशात घडलेल्या प्रकारांनी २०२२ मध्ये श्रीलंकेतील अराजकाची आठवण करून दिली आहे. भारताचा शेजारी देश असणार्या श्रीलंकेमध्ये राजपक्षे बंधूंनाही अशाच प्रकारे लोकक्षोभामुळे सत्तेतून बाहेर पडण्यास आणि परदेशात पळून जाण्यास भाग पडले होते. अर्थात, दोन्ही देशांतील असंतोषाची कारणे वेगवेगळी आहेत, हेही लक्षात घ्यायला हवे. हसीना यांच्या राजीनाम्यानंतर बांगला देशात अंतरिम सरकार स्थापन होणार असल्याचे तेथील लष्कराने म्हटले आहे; मात्र अद्यापही बांगला देशामध्ये हिंसाचार सुरूच आहे. हा हिंसाचार आटोक्यात कधी आणि कसा येतो, हे पाहणे अधिक महत्त्वाचे ठरणार आहे.

बांगला देशातील अस्थिरतेची स्थिती आणि हिंसाचाराचा वणवा भारतासाठी निश्चितच चिंतेची बाब आहे. या अशांततेचा मोठा परिणाम भारताच्या अंतर्गत सुरक्षेवर होणार आहे. हसीना यांच्या कार्यकाळात भारत–बांगला देश संबंध खूप सुधारले होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि हसीना यांच्यातील व्यक्तिगत सलोखाही चांगला होता. त्यांच्या कार्यकाळात भारत–बांगला देश यांच्यातील आर्थिक व व्यापारी संबंधांनाही चालना मिळाली. तसेच बांगलादेशी घुसखोरींच्या प्रश्नावरही त्यांनी बर्याच अंशी नियंत्रण मिळवले. त्यामुळेच बांगला देशातील पंतप्रधान पदाचा राजीनामा दिल्यानंतर हसीना भारतात पोहोचल्या. त्यांच्या देश सोडून जाण्याच्या भूमिकेनंतरही बांगला देशातील हिंसाचार थांबलेला नाहीये. अशा स्थितीत हसीना यांच्या जागी अन्य एखादे नेतृत्व उदयाला आल्यास, अवामी लीग त्यांना पंतप्रधान बनवू शकते.

सध्या बांगला देश लष्कराच्या ताब्यात आहे; मात्र तेथील हिंसाचारावर नियंत्रण ठेवण्यात लष्करालाही यश आलेले नाहीये. सध्या बांगला देशामध्ये सुमारे दोन कोटींहून अधिक हिंदू आहेत. सध्याच्या परिस्थितीत या हिंदूंना आणि त्यांच्या मालमत्तांना, घरांना लक्ष्य केले जात आहे. आजवरचा इतिहास पाहिल्यास, अशा हिंसाचारात नेहमीच हिंदूंना लक्ष्य केले जाते, त्यामुळे हे हिंदूही भारतात आश्रयाला येऊ शकतात. बांगला देशातील या सर्व अराजकामध्ये पाकिस्तानचा खूप मोठा हात आहे. विशेषतः पाकिस्तानची गुप्तहेर संघटना 'आयएसआय'ने यामध्ये मोठी भूमिका बजावली आहे. याखेरीज चीनलाही बांगला देशात अशांतता पसरवायची आहे.

# कापूस, सोयाबीन शेतकऱ्यांना पाच हजारांचे अर्थसाह्य

## पण त्यासाठी हे करणे बंधनकारक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती –** गेल्या वर्षीच्या खरीप हंगामात कापूस आणि सोयाबीन लागवड केलेल्या शेतकऱ्यांना राज्य सरकारकडून प्रतिहेक्टरी ५ हजार रुपयांचे अर्थसाह्य देण्यात येणार आहे. मात्र, ही मदत देताना ई–पीक पाहणी ॲपवर नोंदणी केलेल्या शेतकऱ्यांनाच याचा लाभ मिळणार आहे, तसेच या शेतकऱ्यांचे बँक खातेही आधार संलग्न असावे, अशी अट घालण्यात आली आहे.




जिल्हानिहाय शेतकऱ्यांच्या याद्या तयार असून, लवकरच ही मदत दिली जाईल, अशी माहिती कृषी विभागातून देण्यात आली. गेल्या वर्षी खरीप हंगामात सोयाबीन आणि कापसाच्या दरात प्रचंड घसरण झाल्याने शेतकऱ्यांचे नुकसान झाले होते.अशा शेतकऱ्यांना प्रतिहेक्टरी पाच हजार रुपये मदत देण्याची घोषणा अर्थमंत्री अजित पवार यांनी अर्थसंकल्पात केली होती. त्यानुसार किमान एक हजार रुपये, तर दोन हेक्टरच्या मर्यादित जास्तीत जास्त दहा हजार रुपये याप्रमाणे अर्थसाह्य देण्यात येणार आहे.त्यासंबंधीचा शासन निर्णयही जारी करण्यात आला आहे. ही मदत देण्यासाठी राज्य सरकारला एकूण ४ हजार १९४ कोटी रुपये ६८ लाख रुपयांचा निधी लागणार आहे.

यातील १ हजार ५४८ कोटी ३४ लाख रुपये कापूस, तर २ हजार ६४६ कोटी ३४ लाख रुपये सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना वितरित करण्यात येणार आहे.या अनुदानासाठी ई–पीक पाहणी पोर्टलद्वारे पिकांची नोंदणी केलेली असणे आवश्यक आहे. ई–पीक पाहणी ॲप ही रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा करण्यात येणार आहे.

### ५३ लाख ८२ हजार शेतकऱ्यांना साह्य

कृषी विभागाने यासाठी जिल्हानिहाय, तसेच तालुकानिहाय याद्या तयार केल्या आहेत. ई–पीक पाहणी केलेल्या शेतकऱ्यांचाच यात अंतर्भाव करण्यात आला आहे. त्यानुसार राज्यातील ५३ लाख ८२ हजार ८२४ सोयाबीन उत्पादक शेतकऱ्यांना याचा लाभ होणार आहे, तर २९ लाख ८९ हजार ९१२ कापूस उत्पादक या योजनेचे लाभार्थी असतील अशी माहिती राज्याचे कृषी संचालक विनय आवटे यांनी दिली.




## शरीरातील टॉक्सिन्स कमी करण्यासाठी तासाभरात कुणी किती प्यावं? जास्त पाणी पिणंही ठरू शकतं घातक..

***दि.८ विदर्भ प्रजासत्ताक***

*कमी पाणी प्यायल्याने शरीरात डिहायड्रेशनची लक्षणे दिसू लागतात. त्यामुळे पाणी पीत राहणं गरजेचं आहे. पाणी प्यायल्याने बरेच आजार दूर राहतात (क्शरश्रींह ढळ्ळी). पण जर शरीरात पाण्याची कमतरता असेल तर, डोकेदुखी, थकवा, चक्कर येणे, अशक्तपणा, रक्तदाब कमी होणे, पायांना सूज येणे, बद्धकोष्ठता, गडद रंगाची लघवी यांसारख्या समस्या निर्माण होतात.त्याचवेळी, जास्त प्रमाणात पाणी प्यायल्याने ओव्हरहायड्रेशन होते. अशा स्थितीत वारंवार लघवी होणे, शरीरात इलेक्ट्रोलाइट्सची कमतरता, उलट्या आणि मळमळ, हात–पायांचा रंग बदलणे, स्नायू दुखणे, डोकेदुखी आणि थकवा जाणवू शकते. त्यामुळे तासाभरात नेमकं किती पाणी प्यावं? असा प्रश्न तुम्हालाही पडला असेल*

***तासाभरात नेमकं किती पाणी प्यावं?***– *हार्वर्ड मेडिकल स्कूल, या वेबसाईटनुसार, आपल्या शरीराला किती पाण्याची गरज आहे, हे वय, शारीरिक हालचाल, लिंग, शरीराचे तापमान, आणि शारीरिक वजन यावर अवलंबून असते. तरीही दर तासाला आपण २ ते ३ कप पाणी प्यायला हवे. जर आपण व्यायाम करत असाल तर, याचे प्रमाण वाढूही शकते. निरोगी व्यक्तीने दिवसातून २– ३ लिटर पाणी प्यावे.*

*भरपूर चालूनही वजन घटेना? 'या' पद्धतीने – 'या' वेळी चाला, वेट लॉस होणारच; फक्त चालताना..*

*पुरेसं पाणी पिण्याचे फायदे*

*– पेशींना पोषण आणि ऑक्सिजन वितरीत करणे*

*– शरीरातून टॉक्सिन्स बाहेर काढण्यास मदत*

*– पचनसंस्था राहते उत्तम*

*– बद्धकोष्ठतेचा त्रास होतो कमी*

*– ब्लड शुगरची पातळी राहते नियंत्रणात*



*– शरीराचे सामान्य तापमान राखणे*

*– शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलित राखण्यास मदत.*

***लघवीचा रंग तपासा***– *लघवीचा रंग आरोग्याविषयी अनेक गुपिते उघड करतो. उदाहरणार्थ, लघवीच्या रंगावरून आपण पाणी जास्त पीत आहात की कमी हे कळू शकते. जर आपल्याला लघवीचा रंग गडद पिवळा असेल तर, डिहायड्रेशनचे लक्षण असू शकते. जर वारंवार पांढऱ्या रंगाची लघवी होत असेल तर, हे ओव्हरहायड्रेशनचे लक्षण असू शकते.वजन कमी करायचं म्हणून साखर बंद करुन गुळ किंवा मध खाता? आहारतज्ज्ञ सांगतात, फायद्याचं नेमकं काय..*

***ही पेय पिणे टाळा***– *हार्वर्ड मेडिकल स्कूलच्या वेबसाईटनुसार, 'तहान भागवण्या साठी अल्कोहोल किंवा कॅफिनयुक्त पेय पिणे टाळावे. शिवाय साखरयुक्त किंवा कार्बोनेटेड पेये पिऊ नयेत. यामुळे रक्तातील साखर तर वाढतेच शिवाय डिहायड्रेशनही होते.*

# खतांवरील खर्च कमी करण्यासाठी विद्राव्य खतांचा वापर केव्हा व कसा करावा?

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती –**

विद्राव्य खते ही पाण्यात पुर्णपणे विरघळणारी असतात. त्यामुळे ही खते पिकांना फवारणीद्वारे किंवा ठिबकद्वारे देणे संयुक्तिक आहे. ही खते पिकांना लवकर उपलब्ध होतात. ही खते पिकांच्या वाढीच्या अवस्थेत देण्याकरीता अधिक फायदेशीर आहेत.

विद्राव्य खते फवारणीद्वारे देत असताना स्टीकर्स वापरणे फायद्याचे असते. बाजारामध्ये वेगवेगळी खतांची ग्रेड उपलब्ध आहेत. त्या–त्या अवस्थेमध्ये ती ग्रेड फवारल्यास उत्पादनामध्ये वाढ दिसून येते. पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार वेगवेगळी खतांच्या ग्रेडची निवड करून त्यांची पिकांवर फवारणी करावी.

**विद्राव्य खतांचे महत्व**

– विद्राव्य खते ही मातीतून दिल्या जाणाऱ्या रासायनिक खतांच्या तुलनेत पिकांना लवकर उपलब्ध होतात.

– रासायनिक खते जमिनीतून देण्यासाठी उशीर झाला असल्यास, ही खते फवारणीद्वारे देता येतात.

– पिकांचे उत्पादन आणि रासायनिक खताचा शास्त्रोक्त वापर यात सांगड घालणे सोपे जाते.

– विद्राव्य खते विभागून देता येतात.

– पिकांच्या मुळांच्या कार्यकक्षेतून निचरून किंवा वायु रूपात वाया जाण्याची शक्यता कमी असते, त्यामुळे विद्राव्य खतांची कार्यक्षमता ही ७० ते ८० टक्के राहते.

– विद्राव्य खतांची कार्यक्षमता ही जमिनीचे गुणधर्म, पाण्याची गुणवत्ता, खताची क्षारता, खते देण्याचा कालावधी आणि खते देण्याची साधने यावर अवलंबून असते.




विदर्भ प्रजासत्ताक कृषी विशेष

**विद्राव्य खतांचा वापर केव्हा करावा**

– जास्त पाण्यामुळे किंवा पाण्याच्या ताणामुळे पिकांना अन्नद्रवे मिळत नसल्यास.

– पीक अन्नद्रव्याची कमतरता दर्शवित असल्यास.

– मातीतून दिल्या जाणाऱ्या खतांची कार्यक्षमता खूप कमी असल्यास.

– सिंचनाची आणि सिंचन संचाची उपलब्धता असल्यास.

– फवारणी करण्याकरीता असलेल्या सुविधा उपलब्ध असल्यास.

**खत किती द्यावे?**

– विद्राव्य खतांचा वापर करीत असतांना आणि त्यांची मात्रा काढत असताना, माती परीक्षण हा महत्वाचा मुद्दा आहे.

– खत मात्रा ठरविण्यासाठी मातीची गुणधर्मेही माहित असणे आवश्यक आहे, अन्यथा खतांवरील खर्च वाढण्याची शक्यता असते.

– माती परीक्षण अहवालातील सहा स्तरीय वर्गीकरणानुसार अथवा विविध पिकांकरीता विकसीत केलेल्या गुणसुत्रांनुसार आणि सिंचनाच्या पाळ्या नुसार मात्रा ठरवावी.

– सहसा विद्राव्य खतांचा वापर करीत असतांना ३–४ ग्रॅम प्रति लिटर या प्रमाणात विविध ग्रेड चा वापर केल्या जातो, काही वेळा ७–८ ग्रॅम प्रति लिटर खत वापर सांगितल्या गेला आहे. म्हणजेच १० लिटर च्या टाकी साठी ७०–१०० ग्रॅम खत वापरणे गरजेचे आहे.

# सध्याची अनुकूलता आमच्या स्वभावाच्या पोषणासाठी प्रतिकूल – सरसंघचालक

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८नागपूर –** दत्ताजींचा काळ हा कार्यविस्तारासाठी अत्यंत प्रतिकूल होता. ही प्रतिकूलता कार्याच्या गुणवर्धनाला अनुकूल बनवत होती. परंतु, आज आमचे काम अजून कठीण झाले आहे. कारण सध्याची अनुकूलता संघाच्या स्वभावाच्या पोषणासाठी प्रतिकूल आहे, असे प्रतिपादन सरसंघचालक डॉ. मोहन भागवत यांनी केले.

दत्ताजी डिडोळकर यांच्या जन्मशताब्दी वर्षाच्या समारोपीय सोहळ्यात ते बोलत होते. या कार्यक्रमाला अंजनगाव सुर्जी देवनाथ मठाचे स्वामी जितेंद्रनाथ महाराज, अभाविपचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. राजशरण शाही, जन्मशताब्दी समारोह समितीचे अध्यक्ष केंद्रीय मंत्री नितीन गडकरी उपस्थित होते. डॉ. भागवत पुढे म्हणाले, आज समाजाने लादलेली अनुकूलता आहे. त्यामुळे आपल्याला त्यासोबत जावेच लागेल. उजवीकडे किंवा डावीकडे जाण्याचा मार्ग



उरलेला नाही. आज रस्ता अनुकूल असून तो आपल्याला टाळता येणार नाही. तेव्हा अनुकूलता असली तरी शील आणि तत्व ढासळू द्यायचे नाहीत. प्रतिकूलतेचा आधार नसल्याने अधिक जोमाने आपल्याला काम करावे लागेल, असे आवाहन सरसंघचालकांनी केले. केवळ लोकप्रियता आणि साधनसंपत्तीच्या भरवशावर आपल्याला कार्यसिद्धीस नेता येत नाही. आज दशा बदलली, समाजाची स्थिती बदलली पण दत्ताजींनी दाखवलेली दिशा बदललेली नाही, असेही ते म्हणाले.

# आगामी विविध क्रीडा स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करा– जिल्हाधिकारी कटियार

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–** जिल्हा क्रीडा कार्यालय, जिल्हा क्रीडा परिषद, तसेच विविध एकविध खेळ संघटनेमार्फत तालुका, जिल्हा व विभागस्तर शालेय विविध क्रीडा स्पर्धाचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच स्क्वॅश व नेटबॉल या राज्यस्तर क्रीडा स्पर्धेचे आयोजन माहे ऑक्टोबरमध्ये होणार आहे. या सर्व स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यासाठी सुक्ष्म नियोजन करावे, अशा सूचना जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी दिले.सन २०२४–२५ या वर्षातील स्पर्धा आयोजनाबाबत जिल्हाधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी यांच्या दालनात बैठक पार पडली, त्यावेळी ते बोलत होते. उपमुख्य कार्यकारी अधिकारी संतोष जोशी, क्रीडा व युवक सेवाचे उपसंचालक विजय संतान, मनपाचे शिक्षणाधिकारी श्री. मेश्राम, जिल्हा पोलिस अधिक्षक कार्यालयाचे शोएब शेख, शिक्षणाधिकारी माध्यमिक प्रिती देशमुख, शिक्षणाधिकारी प्राथमिक श्री. सोनोने, जिल्हा माहिती कार्यालयाचे सतिश बगमारे, क्रीडा अधिकारी संतोष विघ्ने, आर. बी. वडते आदी



उपस्थितीत होते.

जिल्हाधिकारी श्री. कटियार म्हणाले की, स्पर्धेचे संघ नोंदणी, खेळाडू नोंदणी, प्रमाणपत्र नोंदणी इत्यादी स्पर्धा आयोजन सुलभ होण्याकरीता ऑनलाईन सॉफ्टवेअरचा लाभ घ्यावा. नविन जिल्हा क्रीडा संकुल येथे धर्नुविद्या, अत्याधुनिक जिम, कुस्ती,ज्युदो, कबड्डी, टेबल–टेनिस, स्क्वॅश या खेळाकरीता आवश्यक सुविधा उपलब्ध करुन द्यावे. तसेच खेळाडूंकरीता वसतीगृह आदी सुविधा क्रीडा संकुल येथे निर्माण करावे. यासाठी नियोजनबद्ध प्रस्ताव क्रीडा विभागास सादर करावे. तसेच क्रीडा संकुलाचे लोकार्पण सोहळा व नविन कामाचे भुमिपुजन लवकरच होणार आहे. त्याअनुषंगाने सर्व कामे तातडीने मार्गी लावावे, असे निर्देश श्री. कटियार यांनी यावेळी दिले.

RNI No. - MAHMAR 2023/84526
Postel Regi. No. - AMT/RNP 546/2024-2026

# विदर्भ प्रजासत्ताक

गुरुवार दि. ८ ऑगस्ट २०२४

शहर/ग्रामिण


# जिल्हा परिषद प्राथमिक शिक्षण विभाग प्रभारी

## पर्यवेक्षिय यंत्रेनेतील अनेक पदे रिक्त - शासनाचे विविध उपक्रम प्रभावित




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती** - अमरावती जिल्हा परीषद मधील प्राथमिक शिक्षण विभागातील अधिकार्यांची पदे रिक्त असल्यामुळे शासनाचे विविध उपक्रम प्रभावित झाले आहे. विदर्भातील शाळा सुरू होऊन एक महीना उलटला आहे.

या काळात शासनाने विविध उपक्रम सुरु केले आहे. शिक्षण सप्ताह, विद्यार्थी गुणवत्ता विकास महाअभियान, मुख्यमंत्री माझी सुंदर शाळा, नव साक्षरता असे उपक्रम पर्यवेक्षिय यंत्रेनेतील रिक्त पदांमुळे प्रभावित झाले आहे. शासनाने अमरावती जिल्हा परीषदच्या शिक्षण विभागातील सर्व रिक्त पदे भरण्याची मागणी करण्यात येत आहे.

अमरावती विभागाच्या शिक्षण उपसंचालकपदी निलिमा टाके यांची नियुक्ती शासनाने केली होती. पण, त्या रुजु न झाल्यामुळे त्यांचा पदभार शिवलिंग पटवे सांभाळत आहे. पाच जिल्हाचे मुख्य पद असताना ते सुध्दा प्रभारी अधिकारी सांभाळत आहे. अमरावती जिल्हा परीषदेच्या प्राथमिक शिक्षणाधिकारी पदाचा अतिरीक्त पदभार उपशिक्षणाधिकारी बुध्दभूषण सोनोने सांभाळत आहे. उपशिक्षणाधिकारीचे दोन पदे रीक्त आहे.

एका पदाचा पदभार भातकुली पं.स.चे गटशिक्षणाधिकारी दिपक कोकतरे यांच्याकडे दिला आहे. शासनाने नव्याने निर्माण केलेले योजना शिक्षणाधिकारी हे पद रिक्त झाले असून त्याचा अतिरीक्त पदभार शिक्षण विस्तार अधिकारी मानकर यांना दिला आहे. अमरावती जि.प.ला १४ गटशिक्षणाधिकारी मंजुर आहे.

त्यापैकी ५ आहेत, ९ पदे रीक्त असून त्या पदांचा अतिरीक्त पदभार कुठे शिक्षण विस्तार अधिकारी यांच्याकडे तर कुठे केंद्र प्रमुख यांच्याकडे आहे.

जेष्ठ शिक्षण विस्तार अधिकारीची ३७ पदे मंजुर असून १७ कार्यरत आहे. २० पदे रिक्त आहे. कनिष्ठ शिक्षण विस्तार अधिकारी यांची २० पदे मंजुर आहे. पैकी ५ पदे रिक्त आहेत. या पदाचा अतिरीक्त पदभार कुठे केंद्र प्रमुखांकडे तर कुठे पात्र मुख्याध्यापक यांच्याकडे आहे. जिल्हात केंद्र प्रमुख यांची १४० पदे मंजुर असुन पदोन्नतीची ३१ पदे रीक्त आहे. सरळ सेवेची ७० पदे रिक्त आहे. पात्र मुख्याध्यापक आणि विषय शिक्षक, सहा.शिक्षक यांची शेकडो पदे रिक्त आहे. गुणवत्तेत जिल्हा आणायचा असेल तर ही रिक्त पदे भरणे आवश्यक आहे.

शिक्षणाधिकारी ते पात्र मुख्याध्यापक हे पर्यवेक्षिय यंत्रणा आहे. हीच पूर्ण नसेल तर शिक्षण विभागाचा डोलारा कसे चालेल. अतिरीक्त पदभारामुळे सर्व यंत्रना मेटाकुटीला आली आहे. पदोन्नती करुन रिक्त पदे भरणे आवश्यक आहे. अमरावती जिल्हात प्राथमिक शिक्षकांची ३०० पदे रिक्त आहे. त्यामुळे दोन शिक्षकी शाळा एक शिक्षिकी झाल्या असून काही शाळांमध्ये एका शिक्षकांकडे दोन ते तिन वर्ग देण्यात आले आहे. त्या शाळेची गुणवत्ता कशी वाढेल, त्यात शिक्षकांकडे अशैक्षणिका कामे आणि आभासी कामे आहेत. जिल्हा परिषद शाळेची गुणवत्ता वाढवायची असल्यास शाळांना पूर्ण शिक्षक असणे आवश्यक आहे.

# बडनेरा रेल्वे उड्डाणपुलाचे बांधकाम रखडले

## नागरिकांना प्रचंड त्रास



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८बडनेरा**
बडनेरा जुनीवस्ती येथे रेल्वे क्रॉसिंग उड्डाणपुलाचे बांधकाम रखडले असून, अप्रोच रस्ते आणि अन्य कामांसाठी लागणारे भूसंपादनाची प्रक्रिया ठप्प आहे. त्यामुळे रेल्वेने उड्डाणपुलाच्या भूसंपादनाच्या योग्य मोबदल्याबाबत त्वरेने निर्णय घ्यावा, यासाठी मंगळवारी प्रकल्पग्रस्त शेतकर्यांनी जिल्हाधिकारी यांची भेट घेऊन कैफियत त्यांच्या पुढ्यात मांडली.दरम्यान, शेतकर्यांनी आमदार यशोमती ठाकूर यांना निवेदन सादर करून समस्या सोडविण्याची मागणी केली. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांना दिलेल्या निवेदनानुसार रेल्वे विभागाने बडनेरा रेल्वे क्रॉसिंगवर उड्डाणपुलाच्या बांधकामासाठी भूसंपादन करण्याचे निश्चित केले आहे. मात्र गत चार वर्षांपासून भूसंपादनाची ढकलगाडी सुरू आहे. बाजारमूल्य वा वाढीव दराने भूसंपादन करावे, अशी न्यायिक मागणी प्रकल्पग्रस्तांनी केली आहे.रेल्वेने या उड्डाणपुलाचे बांधकाम अर्धवट केले आहे. त्यामुळे या पुलाच्या खालील भागातून विद्यार्थी, ग्रामस्थ, व्यावसायिक, कामगारांना जीव मुठीत घेऊन ये-जा करावी लागते. याच मार्गावरून १५ ते २० ग्राम जुळले आहे. नागपूर महामार्ग रिंगरोड, एमआयडीसी, अभियांत्रिकी महाविद्यालय, रायसोनी विद्यापीठ, रेल्वे स्थानक, वॉलमार्ट असून प्रचंड वाहतूक याच पुलाखालून दरदिवशी होत आहे. बांधकाम रखडल्यामुळे भूसंपादन केव्हा होणार याबाबत प्रकल्पग्रस्त शेतकरी चिंतित आहेत.

न्यायिक व कायदेशीरपणे भूसंपादनाचा मोबदला मिळावा, अशी माफक अपेक्षा निवेदनातून केली आहे. भूसंपादनाची रितसर प्रक्रिया होत नाही, तेथपर्यंत संबंधित रेल्वे विभागाने किंवा कंत्राटदाराने मालकीच्या जमिनीवर काम करू नये किंवा यांना तशी परवानगी भू-संपादन कार्यालयाने देऊ नये, अशी मागणी मुन्ना उर्फ देवेंद्र जोशी, अब्दुल सलिम, आसिफ हुसेन, अब्दुल नगमान, सय्यद वखार, राजेश उसरे, पवन उसरे, विशा, डाबरे, मुकेश उसरे, कमलकिशोर कासट, रोसम्मा वेटपल्ला, कमलादेवी मालाणी, सुरेश जोशी, अनिल छतवानी, आभा हेडा आदी प्रकल्पग्रस्त शेतकर्यांनी केली आहे.

# 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना'; पात्र लाभार्थी महिलांना आर्थिक पाठबळ देणारी

*विशेष लेखराज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वात नुकतीच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना सुरू करण्यात आली असून, या योजनेतून पात्र महिला लाभार्थ्यांना दरमहा दीड हजार रुपयांचे अर्थसहाय्य लाभणार आहे.*

*उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या नेतृत्वात राज्य शासनाची महत्वाकांक्षी 'मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजना' सुरु करण्यात आली असून, या योजनेत सहभागी होण्यासाठी जिल्ह्यात सर्वत्र ऑनलाईन आणि ऑफलाईन पद्धतीने नाव नोंदणी केली जात आहे. त्यामुळे मुख्यमंत्री -माझी लाडकी बहीण योजनेत जिल्ह्यातील पात्र लाभार्थी महिलांनी अर्जाची नावनोंदणी करण्यासाठी राज्य शासनासह स्थानिक जिल्हा प्रशासनाकडून मोठ्या प्रमाणावर सुविधा उपलब्ध करून देण्यात येत आहेत.*

*या योजनेअंतर्गत २१ ते ६५ वयोगटातील पात्र महिलांना राज्य शासनामार्फत दरमहा दीड हजार रुपये दिले जाणार आहेत. योजनेचा लाभ घेण्यासाठी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयापेक्षा कमी असणे आवश्यक आहे. मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेचा लाभ घेण्यासाठी आता ३१ ऑगस्टपर्यंत महिलांना अर्ज करता येईल. त्यासाठी राज्य शासनाच्या आदेशानुसार जिल्हा व स्थानिक प्रशासनाची यंत्रणा युद्धपातळीवर याकामी लागली आहे.*

**योजनेसाठी या महिला आहेत पात्र*लाभार्थी महिला महाराष्ट्र राज्याची रहिवाशी असणे आवश्यक आहे. राज्यातील विवाहित, घटस्फोटित, परित्यक्त्या आणि निराधार महिला आता नवीन बदलानुसार २१ ते ६५ वर्ष वयोगट करण्यात आला आहे. या योजनेअंतर्गत लाभ घेण्यासाठी अर्ज करणाऱ्या लाभार्थी महिलेचे बँक खाते असणे आवश्यक आहे. तसेच यामध्ये कुटुंबातील केवळ एका*




*अविवाहितेलाही या योजनेचा लाभ मिळणार आहे. त्याशिवाय लाभार्थी कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न हे अडीच लाख रुपयांपेक्षा अधिक असता कामा नये.*

*आवश्यक असणारी कागदपत्रेयोजनेच्या लाभासाठी ऑनलाईन आणि ऑफलाईन अशा दोन्ही पद्धतीने अर्ज स्वीकारण्यात येत असून, यासाठी लाभार्थ्याचे आधार कार्ड असणे आवश्यक आहे. लाभार्थी महिलेकडे अधिवास प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास १५ वर्षापूर्वीचे रेशन कार्ड, मतदार ओळखपत्र, शाळा सोडल्याचे प्रमाणपत्र, जन्म दाखला या ४ पैकी कोणतेही एक ओळखपत्र किंवा प्रमाणपत्र यासाठी ग्राह्य धरण्यात येत आहे. त्यामुळे आता या योजनेचा लाभ घेण्यासाठी कागदपत्रांमध्येही सुलभता आणण्यात आली आहे. यासोबतच सक्षम प्राधिकारी यांनी दिलेला कुटुंब प्रमुखांचा अडीच लाख रुपये उत्पन्नाचा दाखला उपलब्ध नसल्यास नवीन बदलानुसार ज्या कुटुंबाकडे पिवळे व केशरी रेशनकार्ड उपलब्ध असेल त्यांना उत्पन्नाच्या दाखला प्रमाणपत्रातून सूट देण्यात आली आहे. याशिवाय बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानाची छायांकित प्रत असणे आवश्यक असून, पासपोर्ट आकाराचा फोटो, रेशनकार्ड असणे गरजेचे आहे. या योजनेच्या अटी-शर्तींचे पालन करण्याबाबतचे हमीपत्रही लागणार आहे.*

**अर्ज करण्याची प्रक्रिया*योजनेचे अर्ज पोर्टल किंवा मोबाईल अँपद्वारे, सेतू सुविधा केंद्राव्दारे ऑनलाईन भरले जाऊ शकतात. तसेच ऑफलाईन अर्जाचीही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. पात्र महिलेस या योजनेसाठी ऑनलाईन अर्ज करता येईल. ज्या महिलेस ऑनलाईन अर्ज सादर करता येत नसेल, त्यांच्यासाठी अर्ज भरण्याची सुविधा आता अंगणवाडी केंद्रात, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/आदिवासी), ग्रामपंचायत, वार्ड, सेतू सुविधा केंद्र येथे उपलब्ध करून देण्यात आले आहेत. मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेसाठी भरलेला अर्ज अंगणवाडी केंद्रात, बाल विकास प्रकल्प अधिकारी कार्यालये (नागरी/ग्रामीण/आदिवासी), सेतू सुविधा केंद्रामध्ये नियुक्त कर्मचाऱ्यांद्वारे ऑनलाईन प्रविष्ट केला जाईल आणि प्रत्येक यशस्वीरित्या दाखल केलेल्या अर्जासाठी त्याची पोच पावती दिली जाणार आहे. या योजनेसाठी अर्ज विनामूल्य भरून देण्यात येत आहेत. यासाठी कोणत्याही प्रकारचे शुल्क आकारले जात नाही. अर्जदार महिलेने स्वतः वरील सुचविलेल्या ठिकाणी उपस्थित राहणे आवश्यक असून, तिचे थेट छायाचित्र काढता येते. त्यामुळे ई-केवायसी करणे सोईचे आणि सुलभ होते. यासाठी महिलेने खालील माहिती आणणे आवश्यक आहे. त्यामुळे मुख्यमंत्री-माझी लाडकी बहीण योजनेत नाव नोंदणी करावी. या योजनेचा लाभ घेण्यासाठी ३१ ऑगस्टपर्यंत नाव नोंदणी करता येणार आहे.*

***श्रीमती अपर्णा यावलकर***
*प्र. जिल्हा माहिती अधिकारी,*
*अमरावती*

# मतदारयादीत आपल्या नावाची खात्री करा, जिल्हाधिकाऱ्यांचे आवाहन

## विधानसभा निवडणुकीसाठी वाढले ३० हजार मतदार

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती :** - विधानसभा निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यातील आठही विधानसभा मतदारसंघाची प्रारुप मतदारयादी मंगळवारी प्रसिद्ध करण्यात आली. यामध्ये लोकसभा निवडणुकीच्या पश्चात २९,८४४ मतदारांची भर पडली आहे. मतदारांनी यादीमध्ये आपले नाव असल्याची खात्री करावी, काही दुरुस्ती असल्यास संबंधित नमुना अर्ज भरून देण्याचे आवाहन जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी केले.



आयोगाच्या निर्देशानुसार ६ ऑगस्टला सर्व मतदान केंद्र, सर्व तहसील कार्यालये तथा उपविभागीय अधिकारी कार्यालये येथे मतदारयादीप्रसिद्ध करण्यात आली आहे. या पुनरिक्षण कार्यक्रमात ज्यांचे मतदारयादीत नाव नाही तसेच ज्यांचे वय १ जुलै २०२४ला १८ वर्षे पूर्ण झाले आहे. अशा सर्व मतदारांची नोंदणी करता येणार आहे. याशिवायमतदारांची नावे या केंद्रातून दुसऱ्या केंद्रात स्थलांतरित करता येणार आहेत.


मृत मतदारांचे नाव कमी करता येणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली लोकसभा निवडणुकीदरम्यान यादीत नाव नसल्याबाबत काही मतदारांच्या तक्रारी प्राप्त होत्या. या सर्व मतदारांनी आपल्या नावाची खातरजमा करावी व नाव नसल्यास नमुना ६ अर्ज जवळच्या मतदान केंद्रावरील बीएलओ यांना रहिवासी व वयाचा पुराव्यासह द्यावा. तसेच VHA (Voter Help Line -pp) voter.eci.gov.in या पोर्टलवर ऑनलाइनसुद्धा नोंदणी करता येते. अंतिम मतदारयादी ३० ऑगस्टला प्रसिद्ध करण्यात येणार असल्याची माहिती जिल्हाधिकाऱ्यांनी दिली.

# अति पावसामुळे संत्रा बागांना लागली गळती

## जमिनीवर पडला संत्रांचा खच

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती** - संत्रा फळबागांसह मोसंबी फळबागांना अतिवृष्टीमुळे गळती लागली असून, यात मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना जबर आर्थिक फटका बसला आहे. बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने फळबागांना जबर फटका बसल्याचे बोलले जात आहे.

विदर्भाच्या कॅलिफोर्नियात संत्रा फळबागांबरोबर मोसंबी फळबागा येथे अंदाजे आठ ते दहा हजार हेक्टरवर उभ्या आहेत. गेली २० दिवस पावसाची संततधार व सूर्यदर्शन नसल्याने फळबागांना धोका निर्माण झाला. संत्रा व मोसंबी फळांना या संततधार पावसामुळे बुरशीजन्य रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने प्रचंड प्रमाणावर संत्रा व मोसंबीची फळे देठापासून गळायला लागल्याने तालुक्यात कोट्यवधी रुपयांचे नुकसान निदर्शनास येत आहे.वघाळ, काटी, राजुरा बाजार, आलोडा, नांदगाव, हातुर्णा, गाडेगाव, वंडली, भापकी, बेलोरा, लोणी, अमडापूर या गावांच्या शिवारातील संत्रा व मोसंबी फळबागांची अवस्था दयनीय झाली आहे. बागेत गळालेल्या फळांचा सडा पाहायला मिळत आहे.कृषी



शास्त्रज्ञांनी तातडीने या बुरशीजन्य रोगास आटोक्यात आणून संत्रा व मोसंबी उत्पादक शेतकऱ्यांना आर्थिक नुकसान होण्यापासून वाचविण्याची मागणी होत आहे.

फळांची गळ एवढ्या मोठ्या प्रमाणावर आहे की, झाडावर फळ राहतील की नाही, याचा धसका शेतकऱ्यांनी घेतला आहे. संत्रा व मोसंबी फळबागांची या अतिवृष्टीमुळे अतोनात हानी झाल्याने शेतकऱ्यांचे कोट्यवधीचे नुकसान झाले आहे.

# चिखलदर्यात पावसाने ओलांडला हजार मिमीचा टप्पा।

## सर्वच धबधबे वाहताहेत ओसंडून




**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ चिखलदरा-** धो-धो कोसळत चेरापुंजीची आठवण करून देणारा पाऊस अंगावर झेलण्यासाठी हजारो पर्यटक पावसाळ्यात चिखलदरा पर्यटन स्थळावर दरवर्षी येतात. त्याचा प्रत्यक्ष अनुभव त्यांनी मागील पंधरा दिवसांपासून संततधार पावसात ओलेचिंब घेऊन अनुभवला. चिखलदरा पर्यटन स्थळावर ७ ऑगस्टपर्यंत १०८८ मिलीमीटर पावसाची नोंद अप्पर प्लेटो येथील जलमापन केंद्रावर झाली आहे. गतवर्षीपेक्षा हा पाऊस अधिक आहे.

विदर्भाचे नंदनवन चिखलदरा पर्यटन स्थळावर कोसळणाऱ्या धो-धो पावसाने हजार मिलीमीटरचा टप्पा पार केला. या पावसामुळे नदी-नाले ओसंडून वाहत असून गगनचुंबी डोंगरदऱ्यातून कोसळणारे धबधबे पर्यटकांच्या डोळ्यांचे पारणे फेडणारे ठरले आहेत.

महाभारत काळाशी नाते सांगणारा भिमकुंड, जत्राडोहसह प्रमुख धबधबे आकर्षणाचे केंद्र ठरले आहेत. मेळघाटच्या पायथ्याशी असलेल्या प्रकल्पांच्या जलसाठ्यात मेळघाटातून वाहत येणाऱ्या प्रवाहांमुळे वाढ झालीआहे.

समुद्र सपाटीपासून ३६०० फूट उंचावर असलेल्या चिखलदरा पर्यटन स्थळावर लाखावर पर्यटकांनी हजेरी लावली आहे. दहा लाखांपेक्षा अधिकचे उत्पन्न स्थानिक नगरपालिकेला पर्यटकांच्या वाहन करातून उपलब्ध झाले आहे.

निसर्गरम्य वातावरणात राज्यासह लागून असलेल्या मध्यप्रदेशातील पर्यटकांची पावले



मेळघाटच्या नागमोडी वळणाच्या रस्त्यावर वळली आहे

विशेष म्हणजे सध्या पावसाळयाचे दिवस असल्याने चिखलदरा या पर्यटनस्थळी विविध ठिकाणच्या पर्यटकांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली आहे.

# बांधकाम कामगार योजना ९० दिवसाच्या फार्मपेटी वर ग्रामसेवकाला सही करण्याची एलर्जी

## माधान येथील नागरिकांची तहसीलदार यांना तक्रार

**सुयोग गोरले**

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती–** चांदुर बाजार तालुक्यातील माधान ग्रामपंचायत मध्ये रुजू असलेले ग्रामसेवक अमोल आडे बनावट कामे करून नागरिकांना सहकार्य देत असून बोगस रित्या माधान मध्ये कामकाजाची पाठराखण करत असल्याची नागरिकांना मध्ये चर्चा सुरू आहे.महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन यांचे अनेक दिवसांपासून आंदोलन सुरू असून तालुक्यातील गाव पातळीवर बांधकाम कामगार योजना ९० दिवस च्या फार्मपेटी वर सही देण्यास नकार देण्यात आला असून बनावट धंद्याला सही देऊन कोऱ्या फॉर्म वर सही कशी काय ? असा मोठा प्रश्न माधान येथील नागरिकांना पडला आहे ?अश्या कित्येक कोऱ्या फॉर्म वर सही करून नवनवीन धंदे तर नाही करत ना असा देखील मोठा प्रश्न




गावातील समस्त नागरिकांना पडला आहे . शासनाच्या माध्यमातून कोऱ्या फार्म वर सही देणे नवीन नियम आला का गेल्या अनेक दिवसांपासून माधान मध्ये श्रीमंत व्यक्तीला बोगसरीत्या सहकार्य देऊन गरिबाला मात्र वाऱ्यावर सोडत असल्याचे नागरीकांना चे म्हणे आहे. शासनाच्या माध्यमातून चांगले काम करण्याकरीता गाव पातळीवर ग्रामसेवक यांची नियुक्ती करण्यात येते मात्र कोऱ्या फॉर्म वर सही करून श्रीमंत व्यक्तीला लाभ देण्याचे मोठे कर्तृत्वान कार्य ग्रामसेवक अमोल आडे माधान मध्ये करत असल्याची चर्चा नागरिकांमध्ये समोर येत आहे. याला तात्काळ आळा घालणे महत्त्वाचे आहे व त्यांच्या वर तात्काळ योग्य कारवाई व्हावी या करिता माधान येथील नितीन हिवे यांनी निवेदन दिल्या ची माहिती दिली आहे .अनेक दिवसांपासून अनेक कामगार परिवार पेटी फॉर्म वर सही पूर्ण फॉर्म भरून ग्रामसेवकाची सही मागण्या करीता वारंवार ग्रामपंचायत कार्यालय येथे ग्रामसेवक यांच्याजवळ मागण्याकरिता जात असताना त्यांना वापस पाठवून मतभेद करत असल्याने या वर जिल्हाधिकारी , तहसीलदार यांनी जातीने लक्ष देवून ग्रामसेवकावर कारवाई करावी अशी मागणी नितीन हिवे, पराग गोरले, रोशन बारस्कर व गावातील नागरिक यांनी केली आहे.

> बांधकाम कामगार योजना ९० दिवस फॉर्म घेऊन मी ग्रामपंचायत कार्यालय माधान येथे ग्रामसेवक अमोल आडे यांच्या जवळ घेऊन गेलो असता त्यांनी माझ्या फार्म वर सही केली नाही. मग कोऱ्या खोट्या फार्म वर सही करून श्रीमंत व्यक्तीला सही कशा काय? दिल्या आम्ही कोणते पाप यांचे केले आहे यांना कोऱ्या फॉर्म वर सही करण्याचा अधिकार शासनाने दिला आहे का? का गावातील श्रीमंत व्यक्तीला सही देणे अन गरिबाला वाऱ्यावर सोडणे असे सांगितले आहे काय असा प्रश्न निर्माण झाला आहे :-
>
> **नितीन हिवे, नागरिक माधान**

> कोऱ्या फार्म वर सही ही माझ्या कडून चुकीने झाली असावी ही माझी सही आहे. माझ्या विरुद्ध तहसीलदार यांना माधान येथील कोणी तरी निवेदन दिले आहे . मला तहसिल कार्यालयातून पत्र आलं त्याचे उत्तर म्हणून मी तक्रारदार यांना उत्तर दिले आहे – **ग्रामसेवक अमोल आडे**

## पावसाने मेळघाटातील पिके धोक्यात

### शेतकरी चिंताग्रस्त –पिके पिवळी पडली

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ धारणी–** यावर्षी मृग नक्षत्रात समाधानकारक पाऊस पडल्यामुळे जून महिन्याच्या अखेरीस व जुलै महिन्याच्या पहिल्या आठवड्यातच तालुक्यातील शेतकर्यांनी लागवड व पेरणी उरकून घेतलेली. मेळघाटात सुरूवातीला चांगला पाऊस पडल्याने उगवण चांगली झाली. वातावरण पोषक असल्याने खरिपाची पिके जोमात असताना गेले दहा ते पंधरा दिवसांपासून संततधार पाऊस सुरू आहे. कापसावर रोगराई पडलेली दिसत असून पावसामुळे शेतात पाणीच पाणी साचले आहे.

गेल्या आठवडाभर सूर्यकिरण नसल्यामुळे तूर, मूग, सोयाबीन, उडीदसह खरिपातील सर्वच पिके पिवळी पडू लागली आहेत. याचा फटका पिकांना बसलेला दिसत आहे. अशा या बिकट परिस्थितीत सर्व




पिके जर हातातून गेली तर भविष्यात कसे होणार? या विचाराने शेतकरी वर्ग चिंताग्रस्त झालेला आहे. कापसावर मर रोगासारखी रोगराई पडलेली दिसत आहे. मात्र, फवारणीही करता येत नाही. बुरशीजन्य रोगांचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता आहे. तो रोखण्यासाठी ताबडतोब या पिकांमधील पाण्याचा निचरा होणे अत्यंत गरजेचे आहे.

## मोर्शीहून शिवभक्त मंडळी मोठ्या महादेवाला रवाना

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ मोर्शी :** श्रावण महिन्याच्या पावनपर्वावर तालुक्यातील शेकडो भोले भक्त मोठा महादेव असलेल्या पचमढीसाठी रवाना झाले आहेत. तेथे दर्शन घेतल्यावर हे भाविक श्रीक्षेत्र सालबर्डी येथे रक्षाबंधनाच्या दिवशी परत येऊन स्वयंभू महादेवाच्या पिंडीला पोवत चढवतात. ही परंपरा गेल्या

कित्येक वर्षांपासून सुरू आहे. मध्यप्रदेशातील नर्मदापुरम



जिल्ह्यातील थंड हवेचे ठिकाण म्हणून प्रसिद्ध असलेले पचमढी या ठिकाणी श्रावण महिन्यात नागपंचमीनिमित्त १० दिवसांसाठी मोठी यात्रा भरत असते. चौऱ्यागड व नागद्वार यांच्यादर्शनासाठी विविध राज्यातील भोले भक्त शिवशंभूच्या दर्शनासाठी जातात. या ठिकाणाला मोठा महादेव असेसुद्धा संबोधले जाते. तालुक्यातील मोर्शी, हिवरखेड, अंबाडा, नेरपिंगळाई आदी ठिकाणांचे भोले भक्त मोठ्या संख्येने पचमढी येथील नागद्वाराचे नागपंचमीला दर्शन घेतात. दुसऱ्या दिवशी चौऱ्यागडाचे दर्शन घेऊन दहा ते बारा दिवसांनी लहान महादेव म्हणून संबोधल्या जाणाऱ्या सालबर्डी येथे दाखल होऊन पहाडावर असलेल्या व बाराही महिने पाणी झिरपत असलेल्या स्वयंभू महादेवाच्या पिंडीला पोवत वाहण्यासाठी जातात. आजही ही परंपरा भक्तांनी जोपासली आहे.

## शैक्षिक महासंघाची उच्च व तंत्र शिक्षण मंत्र्यांसोबत विभागाच्या अधिकाऱ्यांशी मॅराथॉन चर्चा

### प्राध्यापकांविषयी महासंघाच्या कळकळीची गांभीर्याने दखल घेऊ – चंद्रकांतदादा पाटील

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती–**

अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघ (महाराष्ट्र प्रांत) पदाधिकाऱ्यांच्या शिष्टमंडळासोबत महासंघाच्या मागण्या आणि विशेष चर्चेसाठी प्रांत अध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर यांच्या नेतृत्वात उच्च व तंत्र शिक्षण मंत्री श्री. चंद्रकांतदादा पाटील यांच्यासोबत नुकतीच मंत्रालय, मुंबई येथे बैठक पार पडली. अनेक मुद्द्यांवर सखोल चर्चा होऊन त्यावर तत्काळ तोडगा निघण्यासाठी राज्य शासनाच्या विभागातील संबंधित अधिकाऱ्यांना देखील पाचारण करण्यात आले होते.

राज्यभरातील विविध समस्यांनी ग्रस्त प्राध्यापकांच्या समस्या आणि त्यावर अपेक्षित समाधान या विषयी शैक्षिक महासंघाने अनेक बैठकांचे आणि चर्चासत्रांचे आयोजन केले. शेकडो प्राध्यापक अडकून असलेल्या मोठ्या समस्यांपासून ते व्यक्तिगत स्वरूपांच्या समस्या देखील या माध्यमातून जाणून घेण्यात आल्या. पारंपारिक, व्यावसायिक, समाजकार्य, क्रीडा व खेळ, ग्रंथालय, संगीत, अश्या वेगवेगळ्या क्षेत्रात कार्य करणाऱ्या प्राध्यापक, प्राचार्य, महाविद्यालये, संस्थाचालक यांच्या समस्या मांडण्यासाठी व त्यावर तोडगा काढण्यासाठी विस्तृत स्वरूपाचे तब्बल ३० मागण्यांचे निवेदन आणि सहा महत्वपूर्ण मागण्याचे विस्तृत मागणीपत्र तयार करून त्यावर विस्तृत चर्चा करण्यासाठी मंत्री महोदयांच्या भेटीची वेळ महासंघाने मागून घेतली होती. निवेदनातील मुद्द्यांचे महत्व आणि त्यामुळे प्रभावित शिक्षकांची संख्या लक्षात आल्यानंतर मंत्री महोदयांनी वेळेचे बंधन न पाळता तब्बल दिड तास शिष्टमंडळाशी प्रदीर्घ चर्चा केली. पूर्ण चर्चेसाठी स्वतः मंत्री महोदय आणि विभागाचे प्रधान सचिव श्री. विकासचंद्र रस्तोगी जातीने उपस्थित होते.

महासंघ प्रतिनिधींनी ठरविलेल्या प्राधान्यक्रमानुसार राज्यभरातील प्राध्यापकांना महासंघाच्या विशेष प्रयत्नातून प्राप्त झालेल्या दिलास्याबद्दल चर्चा करण्यात आली. सहयोगी प्राध्यापक पदाच्या

> एमफील प्राध्यापकांची समस्या पूर्णतः संपविण्याच्या दृष्टीने युजीसी कडे शासनासोबत महासंघाचे प्रतिनिधी घेण्याची भूमिका अत्यंत आनंददायी आहे. सहयोगी प्राध्यापक पदोन्नती साठी पीएचडी अट शिथिल करणे, राज्यभरात प्राध्यापकांचे ४५०० पदे व १५०० शिक्षकेत्तर पदे भरण्यासाठी होकार, संगीत आणि तत्सम विषयांसाठी शिक्षकेत्तर पद निर्मिती, पेन्शन प्रती सकारात्मकता, आणि इतरही मागण्यांची महासंघाने केलेली अभ्यासपूर्ण मांडणीला मंत्री महोदयांनी दिलेली दाद खऱ्या अर्थाने शैक्षिक महासंघाला आणि संपूर्ण प्राध्यापक समुदायासाठी उत्साहवर्धक असून त्या मागण्या तात्काळ सोडविण्यासाठी शासनाने सर्वतोपरी प्रयत्न करावे
>
> **–प्रा. प्रदीप खेडकर**, अध्यक्ष, शैक्षिक महासंघ महाराष्ट्र प्रांत

स्थाननिश्चितीसाठी पीएचडीच्या अटी संदर्भात युजीसीच्या सन्माननीय अध्यक्ष व सचिवांच्या शैक्षिक महासंघासोबत झालेल्या बैठकीत घेण्यात आलेल्या एका महत्त्वपूर्ण निर्णयाच्या माध्यमातून सहयोगी प्राध्यापक पदी पदोन्नती प्राप्त करण्यासाठी पीएचडी ची अट डिसेंबर २०२४ पर्यंत शिथिल करण्यात आली. त्याबाबत यूजीसीने महासंघास पत्रक देऊन तसेच जाहीर गॅझेट नोटिफिकेशन काढून स्पष्टता आणली. केंद्र शासनाचे नोटिफिकेशन निर्गमित झाल्यावर संघटनेच्या माध्यमातून राज्यशासनाला विनंती करून



देखील अद्याप या अधिसूचनेनुसार लाभ राज्यातील प्राध्यापकांना मिळाला नसल्याबद्दल तीव्र नाराजी प्रांत अध्यक्ष प्रा. प्रदीप खेडकर यांनी व्यक्त केली. हि बाब मंत्री महोदयांच्या लक्षात आणून दिल्यानंतर नामदार चंद्रकांतदादा पाटील यांनी संबधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन केंद्र शासनाच्या राजपत्राची त्वरित अंमलबजावणी करण्याची ग्वाही दिली.अखिल भारतीय राष्ट्रीय शैक्षिक महासंघाच्या वतीने प्रा. प्रदीप खेडकर, प्रा. डॉ अनिल कुलकर्णी, ऋप्रा डॉ शेखर चंद्रात्रे यांनी बाजू सर्व समस्या भक्कमपणे मांडल्या व उच्च व तंत्र विभागाच्या सहकार्याची अपेक्षा ठेऊन सर्व अधिकारी तसेच मा. चंद्रकांतदादा पाटील यांचेही आभार व्यक्त केले.

शैक्षिक महासंघाच्या शिष्टमंडळात ऋप्रा संतराम मुंडे, ऋप्रा डॉ शशिकांत तांबे, ऋप्रा डॉ ज्ञानोबा मुंडे, ऋप्रा डॉ धोंडिबा पवार, प्रा डॉ विठ्ठल सोनटक्के, ऋप्रा डॉ. निखिल कारखानिस, प्रा. डॉ अरूण चव्हाण, डॉ अहिरे, प्रा. अभिजित दौड, ऋडॉ अजय अभ्यंकर तर शासनाचे प्रतिनिधी डॉ. प्रकाश बच्छाव यांच्यासह विभागाचे सर्व अधिकारी उपस्थित होते.

## नियोजनाअभावी अचलपुरात तीव्र पाणीटंचाई

### नागरिकांची भटकंती, पालिका प्रशासनाचे दुर्लक्ष

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अचलपूर –**

अचलपुरातील पाणी पुरवठा हा नेहमीच चिंतनाचा विषय राहिला आहे. काही भागात मुबलक पाणी तर काही भागात पिण्याकरिताही पाणी नाही, अशी स्थिती असते.अचलपूर शहरात नगर परिषदेचा पाणीपुरवठा हा नेहमीच एक समस्येचा प्रश्न राहिला आहे. उन्हाळ्यात तर पाणी मिळतच नाही पण पावसाळा असतांना सुद्धा काही भागात लोकांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागत आहे. पाणी हे जीवन आहे, ते जपून वापरले पाहिजे, हे जरी सत्य असले तरी नगरपरिषद पाणीपुरवठा विभागाचे याकडे दुर्लक्ष आहे. काही भागात मुबलक पाणी पुरवठा होतो. त्या पाण्याने लोक आपली जनावरे व वाहने धुतात किंवा ते पाणी सांडपाण्याच्या नालीने वाहत राहते तर काही भागात पिण्याकरिताही पाणी मिळत नाही. अचलपूर शहरात तसे पाहिले तर पाणी कमी नाही; पण प्रशासनाचे यावर नियंत्रण नाही. पाणी वितरणातील नियोजनाअभावी काही भागात पावसाळ्यातही पिण्याचे पाणी मिळत नाही. रायपुरा येथील नगरपरिषद प्राथमिक शाळेच्या परिसरात गेल्या अनेक महिन्यांपासून पाणीपुरवठा विभागाचे पाणी नळाला येत नाही. या अगोदर सुद्धा अशी तक्रार नगर परिषदेच्या पाणी पुरवठा विभागाला केली, तव्हा उन्हाळ्याचे कारण पुढे केले होते. पण आता पावसाळा असूनही नळाला पाणी येत नाही. यावरून पाणीपुरवठा विभागाचे वितरणाचे नियोजन नसल्याचे स्पष्ट दिसते. कारण काही भागात नळाचे पाणी सांडपाण्याच्या नालीतून वाहत आहे तर काही भागात पिण्याकरिताही पाणी नाही.

पाणीपुरवठा करतांना ठेवावयाचा पाण्याचा दाब हा शहराच्या विस्तार व भौगोलिक परिस्थितीचा विचार करून ठेवणे आवश्यक आहे. अचलपूर शहरात अनेक लोकवस्ती उंच



भूभागावर वसलेली आहे. त्यामुळे पाण्याचा दाब कमी ठेवल्याने मैदानी सपाट भागात पाणी पोहचते, मात्र उंच भागात पोहचत नाही. तसेच शहरात असंख्य भागात प्रशासनाने बोअर केले. त्यामुळे पाण्याचा अपव्यय जास्त होतो व पाण्याची पातळी कमी होते.

नगरपरिषद प्रशासनाने याकडे लक्ष द्यावे, अशी सामान्य नागरिकांची मागणी आहे.

## महावितरणकडे १३ लाख ग्राहकांची मोबाइल नोंदणी

### वीज बिलासाठी मोबाइल, ई–मेल नोंदवा

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८अमरावती–**

महावितरणकडून ग्राहकांना ऑनलाइन वीज बिल उपलब्ध करून देण्याची सुविधा आहे. त्यामुळे ज्या ग्राहकांनी आपले मोबाइल क्रमांक तसेच ई–मेल आयडीची नोंदणी महावितरणकडे केली आहे, अशा ग्राहकांना दरमहा वीज बिल तयार होताच ते ऑनलाइन पाठविण्यात येते. अमरावती परिमंडळामध्ये सर्व वर्गवारीतील १४ लाख ४६ हजार ३०१ ग्राहक असून, त्यातील १३ लाख ३६ हजार ७३१ ग्राहकांनी महावितरणकडे मोबाइल क्रमांकाची नोंदणी केली आहे.

महावितरणने काही वर्षांपूर्वी केंद्रिकृत बिलिंग प्रक्रिया सुरू केली आहे. त्यासाठी मोबाइल अॅपद्वारे प्रत्येक महिन्याच्या १ ते २५ तारखेतील एका निश्चित तारखेला लघुदाब वीज ग्राहकांकडील मीटरचे रीडिंग घेतले जाते. त्यानंतर केवळ चार ते पाच दिवसांत वीज बिल तयार करून ते मोबाइलवर एसएमएस किंवा ई. मेलद्वारे ग्राहकाला पाठविले जाते. त्यासाठी मोबाइल क्रमांक व ई–मेल आयडीची महावितरणकडे नोंदणी गरजेची आहे.

विशेष म्हणजे अशा




ग्राहकाला मोबाइल क्रमांक व ई–मेल या दोन्हीवरही दरमहा वीज बिल पाठविले जाते. अमरावती जिल्ह्यातील ७ लाख ३३ हजार ३६७, तर यवतमाळ जिल्ह्यातील ६ लाख ३ हजार ३६४ ग्राहकांनी मोबाइल क्रमांकाची नोंदणी केली आहे. वीज बिलाच्या तारखेपासून सात दिवसांत भरणा केल्यास एक टक्का प्रॉम्प्ट पेमेंट डिस्काउंट मिळते.त्याची तारीख वीज बिलात नमूद असते. एसएमएस किंवा ई–मेलवर वीज बिल घेतल्यास ही सूट मिळविणे अधिक सोयीचे आहे. मोबाइल क्रमांक नोंदणी केल्यास पूर्व नियोजित देखभाल–दुरुस्ती, खंडित वीजपुरवठ्याची माहिती , मीटर रीडिंग घेतल्याची तारीख व युनिटची संख्या, वीज बिलाची रक्कम, देय दिनांक, वीज पुरवठा खंडित करण्याची नोटीस याची माहिती मोबाइलवर येते. त्यामुळे सर्व ग्राहकांनी मोबाइल क्रमांकाची नोंदणी करण्याचे आवाहन महावितरण प्रशासनाने केले आहे.

## महापालिका आयुक्तांचा तात्पुरता प्रभार जिल्हाधिकाऱ्यांकडे

**विदर्भ प्रजासत्ताक**

**दि.८ अमरावती**



फोटो मनपाअमरावती महापालिका आयुक्त सचिन कलंत्रे यांच्या आईचे निधन झाल्यामुळे ते काही दिवसांसाठी रजेवर गेले आहेत. त्यामुळे त्यांच्या पदाचा अतिरिक्त प्रभार जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांच्याकडे देण्यात आला आहे.दोन दिवसांपूर्वी आयुक्तांच्या मातोश्रींचे निधन झाले. त्यामुळे – आयुक्तांना तडकाफडकी त्यांच्या गावी नाशिक येथे जावे लागले. परिणामी, राज्य शासनाच्या सामान्य प्रशासन विभागकडून ६ ऑगस्ट रोजी अतिरिक्त प्रभाराबाबत आदेश जारी करण्यात आले. त्यानुसार जिल्हाधिकाऱ्यांकडे महापालिकेच्या आयुक्तपदाचा प्रभार देण्यात आला. त्यामुळे आज महापालिकेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना फाईल्स घेऊन जिल्हाधिकारी कार्यालयाच्या फेऱ्या वाढायला सुरुवात झाली आहे.

# पीक विम्याची भरपाई लवकर मिळत नसल्याने अनेक शेतकऱ्यांची विम्याला पाठ : २५ टक्के क्षेत्र विमा संरक्षण शिवाय

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

पंतप्रधान पीकविमा योजनेला अमरावती विभागात गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा कमी प्रतिसाद मिळाला आहे. एक रुपयात विमा ही सुविधा उपलब्ध असतानाही अनेक शेतकऱ्यांनी विमा योजनेकडे पाठ फिरवल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. विभागातील पेरणी क्षेत्रापैकी ७५ टक्के क्षेत्र अंतिम मुदतीपर्यंत विमा संरक्षित होऊ शकले आहे.

महाराष्ट्र सरकारने २०२३ मध्ये पंतप्रधान पीकविमा योजनेत मोठा बदल करण्याचा निर्णय घेतला. गेल्या वर्षीपासून सर्वसमावेशक पीक विमा योजना राज्यात राबविण्यात येत आहे. त्यानुसार, शेतकऱ्यांना केवळ १ रुपयात पीकविम्यासाठी अर्ज करता येतो. तरीही पीकविमा योजनेतील शेतकऱ्यांचा घटता सहभाग चिंतेचा विषय बनला आहे. ३१ जुलै ही या योजनेतील सहभागाची अंतिम मुदत होती. खरीप हंगाम २०२४ मध्ये विभागात सरासरी पेरणी क्षेत्र ३१ लाख ५८ हजार ८७२ हेक्टर असून प्रत्यक्ष ३० लाख ७३ हजार ५२९ हेक्टरमध्ये पेरणी झाली आहे. पेरणीचे प्रमाण सरासरी९७ टक्के आहे. या तुलनेत पीकविमा योजनेत सहभागी शेतकऱ्यांची संख्या व क्षेत्र कमी आहे. विभागातील १३ लाख ४७ हजार




१९५ शेतकऱ्यांनी पीकविमा काढला आहे. २३ लाख ५३ हजार ४८० हेक्टर क्षेत्राला विमा कवच मिळाले आहे. एकूण पेरणी क्षेत्राच्या तुलनेत ७५ टक्के क्षेत्र विमा संरक्षित झाले आहे. याचा अर्थ २५ टक्के क्षेत्र विमा संरक्षणात आले नाही. गेल्या वर्षी १४ लाख२९ हजार ९६४ शेतकऱ्यांचे २४ लाख ५६ हजार ७४० हेक्टर क्षेत्र विमा संरक्षित झाले होते. उंबरठा उत्पादन व अन्य अनेक निकष या पीक विमा योजनेत आहेत. एक रुपयात पीकविमा योजनेत सहभाग, असा उपक्रम सरकार राबवित आहे. परंतु, या योजनेतून गेल्या वेळी अनेकांना परतावे मिळाले नाहीत. दुष्काळी स्थिती होती. परंतु, उंबरठा उत्पादनाचा निकष आणि इतर अटीमुळे कापूस, सोयाबीन व अन्य पिकांचे नुकसान होऊनही परतावे योग्य प्रमाणात मिळाले नाहीत. सरकार योजनेचा गवगवा करते, पण भरपाई मिळत नाही, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

# ज्ञानेश्वरी समूपदेशन केंद्राकडून विविध रोपांचे वाटप



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

वृक्षसंवर्धन आणि संगोपनाचा विषय पुढे ठेवून ज्ञानेश्वरी शिक्षण संस्थेद्वारे संचालित ज्ञानेश्वरी समूपदेशन केंद्राच्या वतीने आयोजित कार्यक्रमात विविध प्रजातींच्या रोपांचे वाटप करण्यात आले.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी केंद्र संचालक वर्षा विनायक गावंडे होत्या. प्रमुख पाहुण्या म्हणून शारदा अंभोरे, प्रभा आवारे, गोविंद कासट, शैलेश पारेख, हरिहर बोचरे, राजेंद्र पचगाडे आदींची व्यासपीठावर उपस्थिती होती. आयोजकांच्या वतीने यावेळी उपस्थितांचा शाल, श्रीफळ व झाड देऊन गौरव करण्यात आला. शारदा अंभोरे व वर्षा गावंडे यांच्या हस्ते रोपांचे वाटप करण्यात आले. दिवसेंदिवस होणारा पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने पुढाकार घ्यावा, असे आवाहन समूपदेशन केंद्राच्या अध्यक्ष वर्षा गावंडे यांनी केले.कार्यक्रमाला शारदा अंभोरे, संजय खांडे, प्रभा आवारे, राजू डांगे, अनिता पारशे, दीपिका चौधरी, सुरेश गुप्ता, संजय फुले, अपर्णा कव्हाने, ज्योती बाविस्कर, सुनील वासनकर, मंदा वासनिक, माधुरी काळसरपे, अर्चना अब्रुक, प्रतीक्षा महाजन, मीना बोबडे, अनामिका संसारे, अरुणा पोलाड आदींची उपस्थिती होती.

# कत्तलीसाठी जात असलेल्या १३ गोवंशांना जीवनदान शेंदूरजनाघाट पोलिसांची कारवाई

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८शे.घाट**

कत्तलीसाठी गोवंशांना घेऊन जात असलेले वाहन शेंदूरजनाघाट पोलिसांनी पकडले. या कारवाईत १३ गोवंशांची सुटका करून त्यांना जीवनदान देण्यात आले. तर एका गोवंशाचा मृत्यू झाला.

गोवंशाची अवैध वाहतूक होत असल्याची माहिती शेंदूरजनघाट पोलिसांना मिळाली. माहितीच्या आधारावर पोलिसांनी पुसलाबसस्टॅण्ड परिसरात नाकाबंदी करून पांढुर्णा येथून वरूडकडे येत असलेल्या संशयास्पद वाहन क्रमांक एमएच २७ व्हीएक्स ०९९४ ला



थांबण्याचा इशारा केला.मात्र, चालकाने न थांबता वाहन माघारी फिरविले. पोलिसांनी वाहनाचा पाठलाग केला. त्यावर चालकाने वाहनसोडून पळ काढला. पोलिसांनी वाहनाची पाहणी केल्यावर त्यात १४ गोवंश दिसून आले. त्यातील एका गोवंशाचा मृत्यू झाला होता.पोलिसांनी वाहन जप्त करून गोवंशांना येरला येथील गोरक्षणमध्ये दाखल केले. या प्रकरणी आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. ही कारवाई ठाणेदार महाडीक यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक शेगोकार, कुंदन मुधोरकर, वीरेंद्र अमृतकर, संदीप वानखडे, वसीम शेख यांनी केली.

# जिल्ह्यातील सरपंच, उपसरपंच पदांसाठी १३ ला निवडणूक : चार तालुक्यांतील १० ग्रामपंचायतीचा समावेश

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती :**

जिल्ह्यातील चार तालुक्यांमधील १० ग्रामपंचायतींमधील सरपंच व उपसरपंचपदांच्या रिक्त जागांसाठी मंगळवार, १३ ऑगस्ट रोजी निवडणूक होणार आहे. जिल्हाधिकारी सौरभ कटियार यांनी याबाबत संबंधित तहसीलदारांना नियोजन करण्याचे निर्देश दिले आहे.

काही ठिकाणी विद्यमान सरपंच व उपसरपंचांनी राजीनामा दिला असून, काही ठिकाणी अपात्रतेची कारवाई किंवा मृत्यूमुळे सदर पदे

रिक्त झाली आहेत. त्यानुसार अंजनगाव सुर्जी तालुक्यातील हसनापूर पार्डी, मलकापूर बु. आणि काळगव्हाण, चांदूरबाजार तालुक्यातील माधान व कृष्णापूर, दर्यापूर तालुक्यातील गौरखेडा व बोराळा, नांदगाव खंडेश्वर तालुक्यातील वडाळा व सावनेर येथील उपसरपंच पदांसाठी ही निवडणूक होणार आहे. याशिवाय नांदगाव खं. तालुक्यातीलच टाकळी बु. येथील सरपंच पदासाठी निवडणूक होणार आहे. दरम्यान, अचलपूर तालुक्यातील कुष्टा खु. येथील ग्रामपंचायत अद्याप पूर्ण संख्येने गठित झाली नसल्याने येथील उपसरपंच पदाची निवडणूक होणार नसल्याचे निवडणूक विभागाने स्पष्ट केले आहे.

# पाणीसाठे हटवा... भंगार फेकून द्या; मग ना हिवताप ना डेंग्यूची भीती एक दिवस कोरडा पाळा; साथीच्या आजारांपासून दूर राहा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

पावसाळ्यात हिवताप, डेंग्यू, मेंदूज्वरसारखे आजार साथीच्या स्वरूपात वाढण्याचा धोका असतो. त्यामुळे हिवताप प्रतिबंधासाठी नागरिकांनी दर आठवड्यातून एक दिवस कोरडा पाळण्याचे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.हिवताप, डेंग्यू, मेंदूज्वरसारख्या कीटक ज्यांनी आजाराची साथ नियंत्रणासाठी ग्रामपंचायतींनी पुढाकार घेणे गरजेचे आहे.शासनाच्या निर्देशानुसार दरवर्षी जून महिन्यात हिवताप प्रतिरोध महिना राबविण्यात येत असतो.यामध्ये पूर्ण महिनाभर कीटक ज्यांनी आजाराबाबत प्रतिबंधक अभियानाची अंमलबजावणी केली तर



आपण हिवताप, डेंग्यू, मेंदूज्वर यासारख्या कीटकजन्य आजाराची साथ रोखू शकतो, जिल्ह्यातील सर्व नागरिकांनी आपल्याला आजार होऊ नये यासाठी दररोज काळजी घ्यावी, असेही जिल्हा आरोग्य विभागाने यावेळी सांगितले.

## नागरिकांनी नेमकी काय काळजी घ्यावी

घराशेजारील पाणीसाठे रिकामे करा, भंगार साहित्यांची लवकरात लवकर विल्हेवाट लावा, कूलरमधील पाणी सतत रिकामे करा, पिण्याचे पाणी झाकून ठेवणे, खिडक्यांना सुरक्षा जाळी बसविणे, पडकी विहीर, हौदात गप्पी मासे सोडा.

## तरच होते डासांचा प्रादुर्भाव रोखण्यास मदत

तालुक्यात दोन दिवस वगळता सलग पंधरा दिवसांपासून पाऊस सुरू आहे. अधिक प्रमाणात पाऊस झाल्याने धान पिकांवर कीड रोगाची शक्यता बळावली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांच्या चितेत भर पडली असून, आता पाऊस पुरेसा झाल्याचे सांगत आहेत. या अभियानांतर्गत आठवड्यातून एक दिवस कोरडा पाणी पाण्याचे साठे रिकामे करणे, ही भांडी घासून पुसून कोरडी केली जातात. घरातील सर्व पाणीसाठा कपड्याने झाकून ठेवला जातो. यामुळे डासांचा प्रादुर्भाव रोखण्यात मदत होते, असे जिल्हा आरोग्य अधिकाऱ्यांनी सांगितले.

# लाडक्या बहिणीला मिळणार; साहेब आमचे कधी देणार? सहा महिने उलटले : गरोदर, प्रसूत महिलांना अनुदानाची प्रतीक्षा



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि८अचलपूर**

राज्य शासनाच्या वतीने मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेंतर्गत महिन्याला दीड हजार रुपये दिले जाणार आहेत, परंतु प्रधानमंत्री मातृ वंदना योजनेचे ५ हजार रुपये महिलांना अनेक महिन्यांपासून मिळालेले नाहीत. या योजनेसाठी पात्र असलेल्या अनेक महिला लाभापासून वंचित आहेत.गरोदर महिला आणि स्तनदा मातांना ५ हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाते. प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजना ही केंद्र सरकारची योजना आहे. जी महिला आणि बाल विकास मंत्रालय व समाज कल्याण विभागामार्फत राबवली जाते. महिलांना हप्त्यामध्ये मदत दिली जाते. जर पात्र महिला जननी सुरक्षा योजनेंतर्गत लाभार्थी असेल, तर तिला अतिरिक्त १ हजार रुपये दिले जातात.

## योजनेसाठी पात्रता काय?

राज्य सरकार किंवा केंद्र सरकारमध्ये नियमितपणे काम करणारी व्यक्ती या योजनेसाठी पात्र नाही. प्रधानमंत्री मातृत्व वंदना योजनेच्या लाभासाठी गर्भवती आणि स्तनदा महिला अर्ज करू शकतात. लाभार्थींचे आधार कार्ड बँक खात्याशी लिंक केलेले असावे. लाभार्थी आणि त्याच्या पतीचा आधार कार्ड क्रमांक देणे अनिवार्य असेल.

## ही कागदपत्रे आहेत आवश्यक

लाभार्थी महिलेने स्वतःची आणि तिच्या पतीची रीतसर स्वाक्षरी केलेले हमीपत्र/संमती पत्र द्यावे लागेल.

मोबाइल नंबर - मोबाईल नंबर आधार कार्डशी लिंक केलेला असावा. बँक खाते तपशील, माता- बाल संरक्षण कार्ड आदी कागदपत्रे लागतात.

# कंत्राटदार कंपनीच्या प्रतिनीधीला आ. बच्चू कडु ने लगावली कानशिलात

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८संभाजी नगर**

दिव्यांग वित्त महामंडळाकडुन मागील महिन्यात झालेल्या ई रिक्षा अतिशय निकृष्ट दर्जाचे वाटप करण्यात आले आहे. या ई रिक्षाच्या अपघात व नियंत्रण गेल्याच्या तसेच बैटरी खराब असल्याच्या अनेक



तक्रारी आल्या. याकरीता दिव्यांग वित्त महामंडळाचे अधिकारी व कंत्राटदार कंपनीस संभाजीनगर येथे लाभार्थी सक्षम रिक्षाची चाचणी घेण्यात आली.या वेळी कंपनी चे काही प्रतिनिधी या वेळी त्या ठिकाणी आले असता समाधानकारक उत्तरे देऊ शकले नाहीत परिणामी बच्चू कडू यांचा पारा चांगलाच गरम झाला असता प्रतिनिधी च्या कानशिलात लगावली.

# काँग्रेस नेते १० ऑगस्टपासून मराठवाडा आणि विदर्भाच्या दौऱ्यावर

## १४ ऑगस्टला अमरावती, यवतमाळ उमेदवारांच्या मुलाखती

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि. ८ अमरावती**

विधानसभा निवडणुकीसाठी महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस सज्ज झाली असून १० ऑगस्टपासून मराठवाडा आणि विदर्भात जिल्हानिहाय बैठका घेतल्या जाणार आहेत. प्रभारी रमेश चेन्नीथला, प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे नेते बाळासाहेब थोरात, अखिल भारतीय काँग्रेस कमिटीचे सरचिटणीस मुकुल वासनिक, विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण, विधान परिषद गटनेते सतेज ऊर्फ बंटी पाटील, प्रदेश कार्याध्यक्ष माजी मंत्री नसीम खान, माजी मंत्री



अमित देशमुख हे जिल्हानिहाय बैठका घेऊन काँग्रेस नेते पदाधिकारी यांच्याशी चर्चा करून निवडणुकीच्या तयारीचा आढावा घेणार आहेत. मराठवाड्यातील दौऱ्यात १० ऑगस्ट रोजी लातूर येथे लातूर, धाराशीव, बीड जिल्हा, दिनांक ११ ऑगस्ट रोजी नांदेड येथे नांदेड, परभणी आणि हिंगोली जिल्हा तसेच दिनांक १२ ऑगस्ट रोजी छत्रपती संभाजीनगर येथे, छत्रपती संभाजीनगर आणि जालना जिल्हा काँग्रेसची बैठक घेऊन आढावा घेतला जाणार आहे. दिनांक १३ ऑगस्ट रोजी विदर्भात बुलढाणा येथे बुलढाणा, अकोला आणि वाशिमची, दिनांक १४ ऑगस्ट रोजी अमरावती येथे अमरावती, यवतमाळ जिल्हयाची बैठक घेऊन आढावा घेतला जाणार आहे, अशी माहिती प्रदेश उपाध्यक्ष संघटन व प्रशासन नाना गावंडे यांनी दिली आहे.

# १२ व १३ ऑगस्ट दोन दिवस नागपूरकरांसाठी रानभाज्यांची पर्वणी

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८नागपूर**

जिल्ह्यातील जैवविविधता व राजभाज्या याचे आकर्षण निसर्गाशी जवळीकता साधणार्या प्रत्येक व्यक्तीच्या मनामध्ये असते. रानभाज्या या केवळ आहार आणि चवीशीच निगडीत नसून अनेक औषधी गुणतत्वे त्यामध्ये दडलेली असते. पिढ्यांपिढया पासून याच्या सेवनाला आपण अधिक महत्व देतो. सिमेंटच्या जंगलात आता मोकळी जागा नावालाच उरली आहे.शहरी नागरिकांना रानभाज्या उपलब्ध होणे तसे दुरापास्त. पण सरकार आता सर्वच गोष्टींमध्ये लक्ष घालू लागले आहे. रानभाज्यांची शहरी नागरिकांना उपलब्धता व्हावी म्हणूनही कृषी खात्याने त्यादिशेने एक पाऊल टाकले आहे.

नागपूरमध्ये नागरिकांना रानमेवा उपलब्ध व्हावा व शेतकरी गटांना यामाध्यमातून ग्राहकांपर्यंत पोहचण्याची संधी मिळावी याउद्देशाने रानभाजी महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. १२ व १३ ऑगस्ट असे दोन दिवस हा महोत्सव सिव्हिल लाईन्समधील जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात तो होणार आहे. या महोत्सवासाठी २० स्टॉल्सची व्यवस्था केली जात असल्याची माहिती 'आत्मा'च्या प्रकल्प संचालिका डॉ. अर्चना कडू दिली.



नागपूर शहरालगतच्या गावखेड्यात शेतात उगवणार्या रानभाज्या शहरात विक्रीसाठी आणणने तसे अवघड आणि खर्चिकही ठरते. शासकीय पाठबळाशिवाय हे शक्य नाही. त्यामुळेच कृषी खात्याच्या माध्यमातून दरवर्षी रानभाज्या उत्सव आयोजित केला जातो व नागपूरकर नागरिक त्याला उत्तम प्रतिसादही देतात. जिल्ह्यात मोठ्या संख्येने असलेले महिला बचत गट यात आर्वर्जून सहभागी होतात. त्यामुळे वेगवेगळ्या प्रकारच्या रानभाज्या खरेदीची पर्वणी नागपूरकरांना मिळते. एकाच ठिकाणी सर्व प्रकारच्या भाज्या मिळत असल्याने नागरिकांनाही इतर ठिकाणी जाण्याची गरज भासत नाही. सिव्हील लाईन्समध्ये अनेक सरकारी कार्यालये आहेत. त्यात काम करणार्या महिला कर्मचार्यांची संख्याही बहुसंख्येने आहे. कार्यालयाची वेळ संपल्यावर त्या घरी परत जातांना रानभाजी महोत्सवाला भेट देऊ शकतात. त्यामुळेच जिल्हाधिकारी कार्यालय परिसरात हा महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. सरकारी कार्यालयात विविध कामांसाठी येणार्यांची गर्दीही मोठ्या प्रमाणात असते. त्यांनाही या महोत्सवाला भेट देऊन रानभाजी खरेदीचा आनंद घेता येऊ शकतो. त्यामुळे जास्तीत जास्त महिला व नागपूरकर नागरिकांनी महोत्सवाला भेट द्यावी असे आवाहन करण्यात आले आहे.

**कोणत्या रानभाज्या मिळणार**

या रानभाजी महोत्सवात केना, कुंजरु, खापरखुटी, पाथरी, कपाळफोडी, टाकळा/तरोटा, मायाळू भाजी, कुरडुची भाजी, शेवळा, करटोली, काटेमाठ, हादगा, दिंडा भाजी, शेवगा, अघाडा, कमळून भाजी, आंबाडी भाजी, तसेच हंगामी फळे येथे ग्राहकांना मिळतील. जास्तीत जास्त नागपुरकरांनी याचा लाभ घेऊन शेतकरी गटांना अप्रत्यक्ष मदत करावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# उद्याचा मोर्चा अडवला तर स्फोट होईल, बच्चू कडू यांचा आपल्याच सरकारला खणखणीत इशारा

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

आ. बच्चू कडू हे आपल्याच सरकारविरोधात नाराज असल्याचे गेल्या काही दिवसांपासून दिसून येत आहे. अमरावतीत त्यांच्या नाराजीचा फटका लोकसभेत दिसला. राज्यात तिसऱ्या आघाडीची चर्चा जोर धरत आहे. शेतकरी, शेतमजूर आणि कष्टकऱ्यांच्या हक्कासाठी ही आघाडी आकार घेण्याच्या तयारीत आहे. विधानसभेपूर्वी बच्चू कडू यांनी त्यांची नाराजी जाहीर केली आहे. उद्या छत्रपती संभाजीनगरमध्ये क्रांती दिनी त्यांनी मोर्चाचे आयोजन केले आहे. तर सरकारला असा खणखणीत इशारा दिला आहे.

छत्रपती संभाजीनगरमध्ये आम्ही उद्या मोर्चा काढणार आहोत. आम्हाला कोणी रोखू शकत नाही कोणतीही शक्ती आम्हाला थांबू शकत नाही. आम्हाला रोखण्याचा प्रयत्न केला, जाणीवपूर्वक कोणी जर आडवं येत असेल तर त्याचा स्फोट होईल, असा इशारा त्यांनी दिला. मोर्चा नंतर आम्ही उद्या पुढ्ची भूमिका घेऊ, असे त्यांनी स्पष्ट केले.दिव्याग मंत्रालय झालं पण मानधन वाढलं नाही. घरकुल नाही, अशी खंत बच्चू कडू यांनी व्यक्त केली. बच्चू कडू यांचा आवाज दाबू शकलं पण शेतकरी शेतमजूरचा आवाज दाबू शकत नाही. आमच्या मागण्या सरकारने सरकारने मान्य केल्या तर निवडणूक लढणार नाही. उद्या मोर्चानंतर काय निर्णय घ्यायचा ते आम्ही ठरवू, असे त्यांनी स्पष्ट केले.



**महायुतीला धक्का देणार?**

उद्याचा मोर्चासाठी पोलिसांनी आम्हाला थांबवण्याचे धाडस करू नये.त्यांनी दंडा उचलला तर आम्ही आणखी ताकदीने समोर जाऊ, असा इशारा त्यांनी दिला. महायुतीत राहायचं की नाही राहायचं उद्या मोर्चा नंतर ठरवू. महायुतीला धक्का द्यायचा की सोबत राहायचं हे दूर जायचं हे उद्या पाहू. आम्ही जागा मागितल्या नाही. आमदारकी मागितली नाही..आमची लढाई ही मुद्यांवर आहे. जर मागण्या माण्य झाल्या नाही तर गाठ आमच्याशी आहे, असा इशारा त्यांनी दिला.

**राणांमुळे भाजपचे मोठे नुकसान**

गेल्या तीन-चार दिवसांपासून नवनीत राणा, रवी राणा आणि आमदार बच्चू कडू यांच्यात कलगीतुरा रंगला आहे. दोन्ही गोटातून एकमेकांवर हल्ले-प्रतिहल्ले सुरु आहेत. राणा यांच्या आरोपांना कडू यांनी उत्तर दिले आहे. आजही त्यांनी राणा यांच्यावर टीका केली. राणामुळे भाजपाचे मोठे नुकसान झाले आहे. भाजप कार्यकर्त्यांना दाबलं जात असल्याचा आरोप त्यांनी केला. त्याचे दुष्परिणाम त्यांना भोगावे लागेल. मुख्यमंत्री पदाचा चेहरा कोण हा मविआचा प्रश्न आहे.पण मुख्यमंत्री कोण हे जनता ठरवेल, असे ते म्हणाले. लाडकी बहीण योजनेला मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना नाव चांगलं आहे. संत्रा संदर्भात केंद्र सरकारने व राज्य सरकारने एक धोरण ठरवलं पाहिजे, अशी मागणी त्यांनी केली.

# शाळांचे दुर्लक्ष भोवले! पेन क्रमांक नसल्याने राज्यात ३५ लाख विद्यार्थ्यांची शोधाशोध



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

पंधरा जूनपासून नवीन शैक्षणिक सत्राला सुरवात झाली आहे. परंतु, गतवर्षी शिक्षण घेत असलेल्या तब्बल ३५ लाख विद्यार्थ्यांचा शिक्षण विभागाला अद्याप शोध घेता आलेला नाही. राज्यातील अनेक शाळांनी विद्यार्थ्यांच्या टीसीवर पेन क्रमांक (पर्मनंट एज्युकेशन नंबर) नोंदविला नसल्याने हा घोळ झाला आहे.

गेल्या वर्षभरात ३५ लाख ७८ हजार ७७३ विद्यार्थ्यांनी शाळा बदलल्या आहेत. त्यातील ४ लाख ६१ हजार ३१५ विद्यार्थी कुठे गेले, याचा हिशोब नुकताच यू-डायस प्लसमध्ये आलेला आहे. आता उरलेले ३१ लाख १७ हजार ४५८ विद्यार्थी कुठे गेले, याचा शोध लावण्याचे आव्हान शालेय शिक्षण विभागासमोर आहे.शिक्षण विभागाने प्रत्येक विद्यार्थ्याला ११ अंकी पेन क्रमांक देण्याचा निर्णय घेतलेला आहे. या क्रमांकानुसार देशभरातील कोणत्याही विद्यार्थ्यांचा शैक्षणिक प्रवास शोधता येणार आहे. परंतु, शाळांनी तो नोंदविण्याकडे दुर्लक्ष केले.त्यामुळे संबंधित विद्यार्थी पुढे कोणत्या शाळेत, महाविद्यालयात गेला त्याची यू-डायस प्लसमध्ये नोंद करणे कठीण झाले आहे. या सर्व विद्यार्थ्यांचा अहवाल महाराष्ट्र राज्य प्राथमिक परिषदेने जाहीर केला असून, त्यातील त्रुटी दूर करण्याच्या सूचना संबंधित विभागांना देण्यात आल्या आहेत.

**तीन लाख आधार बनावट**

कोणत्याही विद्यार्थ्याला शाळेत प्रवेश दिल्यानंतर त्याची नोंद स्टुडंट पोर्टलवर आधार क्रमांकासह करावी लागते. परंतु, तब्बल तीन लाख एक हजार ९४५ विद्यार्थ्यांची नोंद बनावट आधार क्रमांकाद्वारे झालेली आहे.

# मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना आणली; अर्जासाठी संकेतस्थळ कधी सुरू होणार?

## लाभार्थ्यांना करावे लागताहेत ऑफलाइन अर्ज : योजनेच्या घोषणेला २५ दिवस लोटले

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८अमरावती**

राज्य शासनाच्या सामाजिक न्याय विभागातर्फे 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' सुरू करण्यात आली आहे. या योजनेची घोषणा होऊन २५ दिवस उलटल्यानंतरही सरकारकडून योजनेचे संकेतस्थळ सुरू करण्यात आलेले नाही. परंतु, समाजकल्याण विभागाकडून ऑफलाइन प्रस्ताव स्वीकारण्यात येत असले, तरी योजनेचे संकेतस्थळ कधी सुरु होणार, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

लोकसभा निवडणुकीत महायुतीला अपेक्षित यश मिळाले नसल्याने सध्या विविध लोकप्रिय योजनांचा सरकारकडून वर्षाव सुरू आहे. राज्यातील सर्वधर्मियांमधील ६० वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांना तीर्थदर्शन यात्रेची मोफत संधी देण्यासाठी 'मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना' शासनाने आणली आहे. या योजनेचा आदेश काढून २४ दिवस झाले तरी अजूनही संकेतस्थळ सुरू झालेले नाही.यामुळे पात्र लाभार्थ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण आहे. सद्यःस्थितीत काही लाभार्थी समाजकल्याण विभागाकडे प्रस्ताव दाखल करत आहेत. तसेच आलेले प्रस्ताव समाजकल्याण विभागामध्ये दाखल केले जात आहेत. या योजनेत सहभागी होण्यासाठी सक्षम अधिकाऱ्याने दिलेला अडीच लाखांच्या आतील उत्पन्नाचा दाखला ग्राह्य धरला जाणार आहे किंवा पिवळे, केशरी रेशनकार्ड असणे आवश्यक आहे.

निवडीची प्रक्रिया कशी असेल ! मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजनेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जामधून जिल्हास्तरीय समितीमार्फत अर्जाची छाननी करण्यात येणार आहे. उद्दिष्टापेक्षा अधिक अर्ज आल्यास प्राप्त अर्जामधून लॉटरी पद्धतीने निवड करण्यात येणार आहे.

# मेळघाट मधिल ७७ गावांमध्ये राणा दाम्पत्यांच्या आभार व संवाद दौरा - गावागावातील आदिवासींचे मानले आभार

## आमदार राजकुमार पटेल बद्दल अनेक आदिवासी बांधवांमध्ये तीव्र नाराजी



**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ अमरावती**

लोकसभा निवडणुकीनंतर प्रथमच राणा दाम्पत्य हे दि. ५ ते ७ ऑगस्ट दरम्यान आभार व संवाद दौरा काढुन मेळघाट मधिल ७७ गावागावात जाऊन प्रत्येक आदिवासी परिवाराचे आभार मानले माजी खासदार नवनित राणा मेळघाट मधिल ज्या ज्या गावात गेले त्या त्या गावामधिल प्रत्येक आदिवासीच्या तोंडुन मेळघाटचे आमदार राजकुमार पटेल यांच्या बद्दल तीव्र नाराजी व्यक्त केल्या जात होती. व त्याच वेळेस आ.राजकुमार पटेल हटाव व मेळघाट बचाव अशा तीव्र नाराजीच्या घोषणा गावागावतून आदिवासी परिवाराच्या तोंडातून निघत होत्या त्याचप्रमाणे नवनित राणा मेळघाट की बेटी थी, बेटी है और बेटी ही रहेंगी अशा घोषणा देत आम्ही सर्व आदिवासी नवनित राणा सोबत नेहमी राहण्याचे आश्वासन समस्त मेळघाटातील आदिवासी परिवाराने नवनित राणा यांना दिले

गेल्या दोन दिवसांपासून राणा दाम्पत्यांनी मेळघाट मधील आदिवासी मतदार बांधवांचे आभार मानण्यासाठी आभार व संवाद दौरा काढला आहे. या दौऱ्या मध्ये राणा दाम्पत्यांनी मेळघाट मधील धुलघाट, पलसकुंडी, शौंडो, जामपाणी, दाबियाखेडा, बिरोटी, बारातांडा, टेंबुरखेडा, खिडकीकला, सावलीखेडा, कोल्हाढाणा, डाबका, नागझिरा, झाजरी ढाणा, भवर, रेटीया, नांदुरा, दादरा, हिराबंबाई, गुलाई, शिवाझिरी, मोताखेडा, सिंगबंद, पजोली, राणीगाव, सुसर्दा, ढोमणठाणा, राजपुर, रानापिसा, लाकदु, बंबईठाणा, गोलाडोह, सादरबाडी, झिल्पी, पातरपुर, बिबामल, खारी, सालाई, बोगदा, रोहिणीखेडा, खरीया टेंभरु, सोनाबडी, रत्नापुर, मोखा, चिचघाट, गुंडवाडी, भोकरबर्डी, गंभेरी, पानखाल्या, नागोढाणा, कापरखेडा, दाबिया, अंबाडी, गोलखेडा, कळमखार, बांबदा, बेडदा, काल्पी, टिंगऱ्या, देहंडा, किन्हीखेडा, कुसुमकोट, शिरपुर, खामदा, भोखडा, कुंड, रंगुबेली, कुटंगा, कसाईखेडा इत्यादी गावांना भेटी दिल्या या वेळी आदिवासी बांधवानी देखील राणा दाम्पत्यांचे आभार मानलेत या दौऱ्यात प्रचंड असा प्रतिसाद राणा दाम्पत्यांना मिळाल्या कारणाने नवनीत राणांचे डोळे पाणावले होते.

या आभार व संवाद यात्रेदरम्यान एका गावातील आदिवासी गरिब कुटुंबातील परिवारासोबत मा.खा.नवनित रवि राणा व आ.रवि राणा यांनी भोजनाचा आस्वाद सुद्धा घेतला. या आभार व संवाद दौऱ्यामध्ये माजी आमदार केवलराम काळे, रमेशजी मावस्कर, रेखा मावस्कर, ज्योती सैरिसे, मालती कास्देकर, दुर्गा बिसांदरे, क्षमा चौकसे, ज्योती सोळंके, सारिका पाटणकर, लक्ष्मण जांभेकर, दुर्योधन जावरकर, निरज मालविय, देवेंद्र टिब, मनिष मालविय, मुकेश मालविय, आप्पासाहेब पाटील, शाम गांगर्डे, सुभाष गुप्ता, नालमवार काका, सुधाकर पकडे, मुन्नीताई भिलावेकर, गायत्री धोत्रे, तन्नु शेख, शांता जांभेकर, ललिता जावरकर, उपेन बछले, सुरळकर मामा, मंगेश पांडे, सोनु धनेगावकर, सागर श्रीवास्तव, लोकेश मालविय, बंटी ठाकुर, रामदास धोत्रे, माधुरी जावरकर, शोयेब मेमन, मोनु मालविय, अरुणा वाघमारे, राजेंद्र सारगे, राहील शेख व हजारोच्या संख्येने आदिवासी महिला-पुरुष उपस्थित होते.


### माझ्यावरचे सर्व आरोप खोटे : आ. राजकुमार पटेल

राणा दाम्पत्यांच्या या आभार व संवाद दौऱ्यात नवनीत राणांनी अनेक गावात छोट्या -मोठ्या सभा घेतल्या व त्या सभेत मेळघाटचे प्रहारचे आमदार राजकुमार पटेलांवर मला निवडणुकी मध्ये पराभूत करण्याची सुपारी घेतली असल्याचा आरोप केला आहे मात्र माझ्यावरचे सर्व आरोप हे खोटे आहेत मी कुणाचीहि सुपारी घेतली नाही. तुमच्या कडे काही पुरावा असेल तर द्या तर मी मान्य करतो उलट नवनीत राणा ह्या खासदार असतांना मेळघाट मधील आदिवासी माता आणि बालकांचा कुपोषणाचा मुद्दा लोकसभेत मांडला होता का ?असा प्रश्न राणा दाम्पत्यांना केला आहे.

# चुरणी जारीदा मुख्यरस्त्यावर पडले जागो जागी खड्डे : अपघात होण्याची दाट शक्यता,प्रशासनाने लक्ष देण्याची गरज

**विदर्भ प्रजासत्ताक**
**दि.८ मेळघाट**

मेळघाटातील चिखलदरा तालुक्यातील चुरणी जारीदा मुख्यरस्त्यावर जागो जागी खड्डे पडल्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही . जारीदा चुरणी मूख्यमार्गावर दररोज हजारो नागरिक आपल्या दैनंदिन कामासाठी येत असते.या रस्त्याची आवक जावक खूप जास्त प्रमाणात असल्यामुळे रस्त्यावर जागो जागी खड्डे झाले आहे.सद्या पावसाळा सुरु असल्यामुळे अनेक अपघाताची प्रकरणे समोर येत आहे.येथील मुख्य रस्त्यावर खड्यात पाणी साचल्यामुळे दळण वळण करणाऱ्या नागरिकांना खड्याचा अंदाज होत नाही. आणि या खड्यातील पाण्यामुळे वाहन चालकाचा तोल बिघडतो यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता असते. रस्त्यावरील खड्यामुळे अपघात होऊन मेळघाटातील अनेक नागरिकांना आपला जीव गमवावा लागला आहे.खड्यामुळे नागरिकांना आपला जीव मुठीत घेऊन



रस्त्यावर प्रवास करावा लागत आहे.चुरणी जारीदा मुख्यमार्ग असून आजूबाजेचे ३०-३५ खेडी गाव दररोज रात्री बे रात्री या रस्त्यावरून प्रवास करीत असतात. चुरणी-जारीदा मुख्यमार्गावरील भंडोरा फाट्याजवळ काही अंतरावर खूप मोठा खोल खड्डा झाला आहे.या खड्यामुळे अनेक नागरिकांना प्रवासात खूप जास्त अडचण निर्माण होत आहे.हा खड्डा अपघाताला आमंत्रण देत आहे.या खड्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता नाकारता येत नाही.स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की,रस्त्यावर मेळघाटात लाखो रुपये खर्च होऊन सुद्धा आज खड्यातून जीव मुठीत घेऊन प्रवास करण्याची वेळ आली आहे.या रस्त्यावर कोणत्या अधिकारी किंवा कर्मचारी यांचे लक्ष नाही का?सदर रस्त्याला वाऱ्यावर सोडले तर नाही ना?असे अनेक प्रशन स्थानिक नागरिक करत आहे.चुरणी जारीदा मुख्यमार्गावराचे खड्डे नागरिकांचा जीव गेल्यावर दुरुस्त होणार का?असे प्रशन नागरीक करत आहे.सार्वजनिक बांधकाम विभागाने त्वरित लक्ष देऊन चुरणी जारीदा मुख्यमार्गावरील खड्डे लवकरात लवकर दुरुस्त करावे अशी मागणी ३०-३५ खेडी गावातील नागरिकांनी केली आहे.